आनंद सागर मंगल कार्यालय
शाकाहारी करिता
एका मंगलमय कार्यासाठी लागणारी सर्व प्रकारची सेवा एकाच छताखाली. आता आनंद सागर मंगल कार्यालय येथे रात्रीच्या कार्यक्रमासाठी भव्य लॉन्स उपलब्ध.
* लग्न सोहळा * साखरपुडा * रिसेप्शन * वाढदिवस
* गेट टुगेदर * कॉन्फरन्स * सांस्कृतिक कार्यक्रम
आकाश वापसा चौरसा, गोल्फ, जकल, देशमुख गेम पंपासमोर कामठा (बु.) नांदेड
व्यवस्था: स्वामी मंडप डेकोरेटर्स, मो. 9325610507,7972904719

गोदातीर समाचार
RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com

जोशी बंधू यांचे ..!!
शंकर भट्ट मंगल कार्यालय
मंगल कार्यासाठी लागणारी सर्व प्रकारची सेवा एकाच छताखाली आपल्या सेवेत..!!
(लग्न, साखरपुडा, मुंज, रिसेप्शन, वाढदिवस, बारसे, डोहाळ जेवण, स्वागत समारोह व ईतर...)
पत्ता : भगवान परशुराम चौक किंनवट रोड भोकर मो. क्र. 9765983335/9960659975/9881881934/9527889927

* वर्ष ६४ वे * अंक ८६ * नांदेड * बुधवार, दि. २ एप्रिल २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎ : 255777, Fax :252211

गुजरातमध्ये फटाका फॅक्ट्रीत स्फोट; १७ जणांचा होरपळून मृत्यू

अहमदाबाद (प्रतिनिधी) – गुजरात येथील बनासकांठा या ठिकाणी असलेल्या फटाका फॅक्ट्रीत स्फोट झाल्याने भीषण आग लागली. गुजरातमधील बनासकांठा येथील फटाक्याच्या कारखान्याला लागलेल्या भीषण आगीत १७ जणांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. कारखान्यात बॉयलरचा स्फोट झाल्याचे सांगण्यात येत आहे. ज्या वेळी ही दुर्घटना घडली तेव्हा कारखान्यात ३० कामगार काम करत होते. या घटनेनंतर मदत आणि बचावकार्य सुरु करण्यात आले आहे. या घटनेत मृतांची संख्या वाढण्याचीही शक्यता आहे. या आगीत अनेक कर्मचारी अडकून पडल्याची भीती आहे.

मंगळवार, दि. १ एप्रिल रोजी सकाळच्या सुमाराला ही घटना घडल्याची माहिती समोर आली आहे. पाच जणांचा जागीच मृत्यू झाल्याची माहिती जिल्हाधिकारी मिहिर पटेल यांनी दिली आहे. तसेच या ठिकाणी बचावकार्य सुरु करण्यात आले आहे, असेही त्यांनी सांगितले.

अपघातानंतरचा एक व्हिडिओही समोर आला आहे. स्फोटामुळे कारखान्याच्या आतील भिंतींना नुकसान झाल्याचे व्हिडिओमध्ये दिसत आहे. टिनचे शेड विखुरलेले आहेत. धुराचे लोट उठताना दिसले. स्थानिक लोकांच्या म्हणण्यानुसार, स्फोटाचा आवाज दूरपर्यंत ऐकू आला. स्फोटामुळे परिसर हादरला.

राज्यात अनेक ठिकाणी अवकाळी पावसाची हजेरी

मुंबई (प्रतिनिधी)– राज्यात बहुतांश ठिकाणी मंगळवारी अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. गारपीट, पाऊस आणि गार वाऱ्याच्या तडाख्यात अनेक शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे.

राज्यात एकीकडे उन्हाचा भडका उडाला असताना दुसरीकडे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ऐन उन्हाळ्यात अवकाळी पावसाने अनेक भागात दमदार हजेरी लावली आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील कडमाड, पैठण, बिडकीन, वैजापूर तालुक्यातील अनेक भागांत अवकाळी पावसाने हजेरी लावली. या अवकाळी पावसामुळे पिकांचे नुकसान झाले आहे. मंगळवारी अचानक काळेभोर ढग दाटून आले, काही भागांत वादळी वाऱ्यासह पाऊस पडला. यामुळे गहू, कांदा, भाजीपाला सह इतर पिकांचे नुकसान झाले आहे.

रत्नागिरी जिल्ह्यातल्या राजापूर शहरात अवकाळी पावसाने हजेरी लावली. त्यामुळे जनजीवनावर त्याचा परिणाम झाला. अवकाळी पावसामुळे प्रमुख पीक असलेला आंबा आणि काजू याला फटका बसला आहे. सध्या कोकणातलं एकंदरीत वातावरण पाहायला गेल्यास बहुतांश ठिकाणी ढगाळ वातावरण असून उकाडा देखील जाणवत आहे. तर पहाटेच्या वेळेला हवेत गारवा आहे.

बीड जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला.बीडच्या पाटोदा तालुक्यातील परिसरात गडगडाटासह जोरदार पाऊस झाला असून शेतकऱ्याच्या उन्हाळी भाजीपाला पिकालाही फटका बसल्याचं सांगण्यात येत आहे. कोल्हापुरातल्या अनेक भागात पावसाच्या हलक्या सरींनी हजेरी लावली. पन्हाळा, राधानगरी, भुदरगड, आजरा आणि शाहूवाडी भागात पावसाच्या हलक्या सरी होत्या. उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना दिलासा मिळाला. मागील चार ते पाच दिवसांपासून लातूर जिल्ह्यात उन्हाची कायली वाढली होती. जिल्हाभरात प्रचंड उकाडा जाणवत होता. मात्र मंगळवारी संध्याकाळपासून जोरदार वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. या पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला आहे.

जिल्ह्यात विजेच्या कडकडाटासह पाऊस व वादळी वारे वाहण्याची शक्यता

नागरिकांनी सावधगिरी बाळगण्याचे आवाहन

नांदेड (प्रतिनिधी)– प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांनी दिलेल्या सूचनेनुसार २ व ३ एप्रिल २०२५ हे दोन दिवसांसाठी यलो अलर्ट जारी केलेला आहे. या दोन दिवसांच्या काळात जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी ४० ते ५० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह हलका व मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याची शक्यता वर्तविली आहे. या नैसर्गिक आपत्ती संदर्भात सर्व संबंधित यंत्रणा व नागरिकांनी काळजी घ्यावी असे, आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने केले आहे.

या गोष्टी करा – विजेच्या गडगडाटासह पावसाची पूर्वकल्पना असल्याने बाहेर जाणे टाळा. जर मोकळ्या जागेत असाल आणि जवळपास कुठल्याही सुरक्षित इमारतीचा आसरा नसेल तर सखल जागेत जाऊन गुडघ्यात डोके घालून बसा. आकाशात विजा चमकत असल्यास घरात किंवा सुरक्षित इमारतीत आश्रय घ्या. घराच्या बाल्कनी, छत अथवा घराबाहेरील ओट्यावर थांबू नका. आपण घरात असाल आणि घरातील विद्युत उपकरणे चालू असतील तर त्या वस्तू त्वरित बंद करा. तारांचे कुंपण, विजेचे खांब व इतर लोखंडी वस्तूंपासून दूर रहा. पाण्यात उभे असाल तर तात्काळ पाण्यातून बाहेर पडा.

या गोष्टी करु नका– आकाशात विजा चमकत असल्यास घरातील लँडलाईन फोनचा वापर करू नका. शॉवरखाली अंघोळ करू नका. घरातील बेसिनचे नळ, पाण्याची पाईपलाइन यांना स्पर्श करू नका तसेच कुठल्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नका. विजेच्या गडगडाटासह वादळी वारे चालू असताना लोखंडी धातूच्या सहाय्याने उभारलेल्या तंबूमध्ये किंवा शेडमध्ये आसरा घेऊ नका.उंच झाडाच्या खाली आसरा घेऊ नका. धातूंच्या उंच मनोऱ्याजवळ उभे टाकू नका. जर आपण घरात असाल तर उघड्या दारातून अथवा खिडकीतून वीज पडताना पाहू नका. हे बाहेर थांबण्याइतकेच धोकादायक आहे.

प्रशांत कोरटकरचा जामीन अर्ज फेटाळला

मुंबई (प्रतिनिधी)– कोल्हापूर कोर्टाने प्रशांत कोरटकरला झटका दिलेला आहे. प्रशांत कोरटकरचा जामीन अर्ज कोर्टाने फेटाळला आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्याविषयी कोरटकरने वादग्रस्त वक्तव्य केलं होतं. त्यानंतर इतिहासकार इंद्रजीत सावंत यांना धमकी देखील दिली होती. त्यानंतर पोलिसांनी कोरटकर याला अटक केली आहे. ३ दिवसांच्या पोलीस कोठडी नंतर कोरटकरची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली आहे.

'स्वारातीम' विद्यापीठांतर्गत पदवी परीक्षेला आजपासून सुरुवात

नांदेड (प्रतिनिधी)– स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठांतर्गत परीक्षेत्रातील चारही जिल्ह्यामधील पदवी परीक्षेला आज दि.२ एप्रिलपासून सुरुवात होत आहे. एकूण १०१ परीक्षा केंद्रावर ०१ लाख ४ हजार ६१६ विद्यार्थी परीक्षा देणार आहेत.

बी. ए., बी.कॉम., बी.एस्सी. आणि आंतरविद्याशाखा यामधील एकूण ३५ अभ्यासक्रमाच्या परीक्षा दि. २ ते ३० एप्रिल दरम्यान होणार आहेत. या परीक्षा सुरळीत होण्यासाठी तथा कॉपीमुक्त होण्यासाठी विद्यापीठाकडून ५२ भरारी पथकांची नेमणूक करण्यात आलेली आहे. याशिवाय विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर सर हे पण अचानकपणे चारही जिल्ह्यातील कोणत्याही परीक्षा केंद्रास भेट देणार आहेत. या दरम्यान परीक्षा केंद्रावर कॉपी अथवा असुविधा आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे, असे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी कळविले आहे.

परिक्षेत्रातील नांदेड, परभणी, हिंगोली व लातूर या जिल्ह्यामध्ये पदवी परीक्षेदरम्यान कोणतेही नियमबाह्य कार्य होऊ नये, याबद्दलची काळजी संबंधित परीक्षा केंद्रावरील पर्यवेक्षकांनी घ्यावी व संस्थेने सहकार्य करावे, शिवाय विद्यार्थ्यांनी कॉपीमुक्त व भयमुक्त परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक हुशारसिंग साबळे यांनी केले आहे.

कुणाल कामराचा शो पाहणे आले अंगाशी, प्रेक्षकांना पोलिसांनी बजावले समन्स

मुंबई (प्रतिनिधी)– कॉमेडियन कुणाल कामरा सध्या चांगलाच चर्चेत आहे. त्याने एका शोमध्ये महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर गाणे केले. या गाण्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होताच कुणाल कामरा वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. पण कुणाल इथेच थांबला नाही. त्याने हा वाद सुरु असताना 'हम होंगे कंगाल' हे आणखी एक गाणे प्रदर्शित केले. या प्रकरणी कामराविरोधात तक्रार दाखल करण्यात आली. आता कुणाल कामराच्या शोला जे प्रेक्षक उपस्थित होते त्यांना पोलिसांनी समन्स बजावले आहे.

मुंबईतील खार पोलिसांनी कुणाल कामराने ज्या शोमधून एकनाथ शिंदे यांच्यावर गाण्यातून टीका केली त्या शोला उपस्थित असलेल्या काही प्रेक्षकांना समन्स बजावले आहेत. जे प्रेक्षक त्या दिवशी कार्यक्रम पाहण्यासाठी आले होते, त्यांचा पोलिसांकडून जबाब नोंदवला जाणार आहे.

राज्यात ई-बाईक धोरण, पुणे-छत्रपती संभाजीनगर हायवेवर टोल

मुंबई (प्रतिनिधी)– राज्य सरकारच्या मंत्रिमंडळाची बैठक मंगळवारी संपन्न झाली, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ बैठकीत काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. ई-बाईक संदर्भात काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. महाराष्ट्रात ई-बाईक धोरण स्वीकारला जाईल, राज्यात लवकरच बाईक टॅक्सी सुरू होईल, अशी माहिती परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी बैठकीनंतर दिली. महिला सुरक्षेच्या दृष्टीने काही नियमावली बनवली जात आहे. तसेच, प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने काही उपाययोजना केल्या जातील, असेही सरनाईक यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

इलेक्ट्रिक वाहनांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्य सरकारकडून ई-बाईकचा पर्याय आणला जात आहे. या ई-बाईकच्या दरांबाबत अद्याप निश्चित झालेलं नाही. दरम्यान, रिक्षा आणि टॅक्सी चालकांना १० हजार रुपयांचे अनुदान द्यायचा प्रयत्न शासन करत आहे. त्यामुळेच, १० हजारांहून अधिक रोजगार मुंबईतच निर्मिती होणार आहेत, याशिवाय पर्यावरणाच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल आहे, अशी माहितीही परिवहन मंत्र्यांनी दिली.

उष्म्यापासून दिलासा! विठुरायाच्या चंदन उटी पुजेला प्रारंभ

पंढरपूर (प्रतिनिधी)– वैशाख वणव्याची दाहकता चैत्रातच जाणवू लागली आहे. त्यामुळं मंदिर समितीने परंपरेनुसार विठुरायाच्या चंदन उटी पूजेस सुरुवात केली आहे. विठुरायावर केल्या जाणाऱ्या विविध प्रकारच्या पूजनासाठी देशभरातील भाविकांकडून मोठी मागणी असते. खास उन्हाळ्यात होणाऱ्या या चंदन उटी पूजा देखील भाविकांच्या खूपच लोकप्रिय असते. यासाठी दरवर्षी चैत्र पाडव्यापासून मृग नक्षत्राने पावसाळ्याची सुरुवात होईपर्यंत दररोज दुपारी चंदनउटी पूजेची परंपरा आहे.

श्रीविठ्ठलाला उन्हाचा त्रास होऊ नये, त्याची तीव्रता कमी व्हावी, थंडावा मिळावा या भावनेतून ही चंदन उटी पूजा केली जाते. विठुरायाप्रमाणे रुक्मिणी मातेला देखील यापद्धतीने चंदन उटी लावण्यास सुरुवात करण्यात आली आहे. प्रतिवर्षी या पूजा भाविकांना देणगी मुल्य आकारून उपलब्ध करून देण्यात येतात. सदरच्या चंदनउटी पुजा मंदिर समितीमार्फत करण्यात येत आहे. श्री विठुरायाच्या चंदन उटी पूजेसाठी २१००० तर रुक्मिणी मातेच्या पूजेसाठी ९००० हजार रुपयांचे देणगीमूल्य मंदिर समिती आकारुन या पूजा देत असतात. आता तीन महिने तीव्र उन्हाळ्याचा काळ असल्याने विठुरायाला या उष्म्यापासून दिलासा मिळावा यासाठी शीतल अशा चंदनाचा लेप संपूर्ण अंगाला लावण्यात येत असतो.

पंजाबने उडवला लखनौचा धुव्वा; प्रभसिमरन, नेहल वढेराच्या वादळी खेळी

मुंबई (प्रतिनिधी)– प्रभसिमरन सिंग आणि नेहल वढेरा यांच्या खणखणीत खेळींच्या बळावर पंजाबने लखनौचा अक्षरक्ष: धुव्वा उडवला. लखनौनं दिलेलं १७२ धावांचं आव्हान लखनौनं १६.१ षटकातच पार केलं आणि ८ विकेट्सनी दणदणीत विजय मिळवला.

पंजाबचा कर्णधार श्रेयस अय्यरने नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला. अर्शदीप सिंगने धोकादायक मिचेल मार्शला पहिल्याच षटकात तंबूत परतावलं. एडन मारक्रम आणि निकोलस पूरन यांनी पंजाबच्या गोलंदाजांचा समाचार घेतला. लॉकी फर्ग्युसनने मारक्रम ला त्रिफळाचीत करत ही जोडी फोडली. ऋषभ पंत आत्मघातकी फटका खेळून बाद झाला. त्याने २ धावा केल्या. डेव्हिड मिलरही १९ धावाच करू शकला. आयुष बदोनी आणि अब्दुल समद या युवा जोडीने लखनौला सन्मानजनक धावसंख्या गाठून दिली. आयुषने ४४ तर अब्दुलने २७ धावांची खेळी केली. पंजाबतर्फे अर्शदीप सिंगने ३ विकेट्स पटकावल्या.

नवं घेताना १५ टक्के कर सवलत मिळणार, सरकारचा निर्णय

मुंबई (प्रतिनिधी)– स्वेच्छेने वाहन मोडीत (स्क्रॅप) काढणाऱ्या वाहनधारकांना पुन्हा त्याचप्रकारचे नवीन वाहन खरेदी करताना १५ टक्के कर सवलत देण्याचा निर्णय मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

नोंदणीकृत वाहन निष्कासन केंद्रावर (आरव्हीएसएफ) परिवहन प्रकारातील वाहनांना नोंदणीपासून ८ वर्षांच्या आत वाहन स्वेच्छेने मोडीत काढल्यास तसेच परिवहनेतर प्रकारातील वाहनांना नोंदणी पासून १५ वर्षांच्या आत स्वेच्छेने वाहन मोडीत काढल्यास १० टक्क्यांची कर सवलत दिली जात होत होती.

यापुढे एकरकमी कर लागू असणाऱ्या परिवहन (ट्रान्सपोर्ट) तसेच परिवहनेतर वाहनांना कराच्या १५ टक्के सवलत दिली जाणार आहे. तर ज्या वाहनांना वार्षिक कर लागू आहे अशा परिवहन प्रकारातील वाहनाच्या नोंदणी दिनांकापासून पुढील ८ वर्षांपर्यंत तर परिवहनेतर प्रकारातील वाहनांसाठी पुढील १५ वर्षांपर्यंत वार्षिक करात १५ टक्के सवलत देण्यात येणार आहे. नोंदणीकृत केंद्रावर (आरव्हीएसएफ) वाहन मोडीत (स्क्रॅप केल्यानंतर) काढल्यानंतर वाहन धारकास मिळालेले ठेव प्रमाणपत्र कर सवलतीसाठी पुढील दोन वर्षे वैध राहणार आहे.

रणवीर अलाहाबादियाला पासपोर्ट देण्यास नकार

नवी दिल्ली (प्रतिनिधी)– गेल्या काही दिवसांपासून प्रसिद्ध युट्यूबर रणवीर अलाहाबादिया एका मोठ्या वादात अडकला आहे. कॉमेडियन समय रैनाच्या 'इंडियाज गॉट लेटेंट' या शोमध्ये केलेल्या वक्तव्यामुळे रणवीरवर सर्वच क्षेत्रातून टीकेची झोड उठली आहे. रणवीरने या शोमध्ये एका सहभागी स्पर्धकाला एक आक्षेपार्ह प्रश्न विचारला होता आणि त्यानंतर यावरूनच रणवीरवर मोठ्या प्रमाणात टीका झाली. या प्रकरणी रणवीर अलाहाबादियाने माफी देखील मागितली होती. मात्र, तरी देखील त्यांच्याविरुद्ध अनेक तक्रारी दाखल झाल्या.

आता रणवीर अलाहाबादियाला सर्वोच्च न्यायालयाने एक धक्का दिला आहे. रणवीर अलाहाबादियाने पासपोर्टची मागणी केली होती. मात्र, ही मागणी सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे. त्यामुळे सध्या तरी रणवीर अलाहाबादियाला पासपोर्ट मिळणार नाही. तसेच या प्रकरणाची पुढील सुनावणी आता दोन आठवड्यांनी होणार आहे.

महापालिकेत उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर आयुक्तांनी घेतला पाणी पुरवठा विभागाचा आढावा

नांदेड (प्रतिनिधी)– येत्या उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर नांदेड शहरास होणारा पाणी पुरवठा सुरळीत राहण्याच्या दृष्टीकोणातून दि. १ एप्रिल रोजी महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी पाणी पुरवठा विभागाचा आढावा घेतला.

नांदेड शहरातील नागरिकांना उन्हाळ्या मध्ये पाण्याची कमतरता भासू नये. तसेच दैनंदिन पाणी पुरवठा यंत्रणा ही सदोष असावी, या हेतूने ही आढावा बैठक आयुक्तांनी घेतली. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, शहर अभियंता सुमंत पाटील, कार्यकारी अभियंता विश्वनाथ स्वामी, उपअभियंता दिलीप टाकळीकर, उपअभियंता प्रकाश कांबळे, शिंदे यांची उपस्थिती होती.

नांदेड शहरास पाणी पुरवठा करण्यासाठी दरवर्षीप्रमाणे विष्णुपुरी प्रकल्पातील एकुण ४३ द.ल.घ.मी. एवढा पाणीसाठा आरक्षित करण्यात आला असून सद्यस्थिती विष्णुपुरी जलाशयात ३२.६० द.ल.घ.मी. पाणी साठा शिल्लक आहे. त्याचप्रमाणे आसना नदीमध्ये आपतकालीन परिस्थिती ओढावल्यास ६ द.ल.घ.मी. पाणी महापालिकेने आरक्षित केला असून या आरक्षित पाण्यापैकी २ द.ल.घ.मी.चा पहिला टप्पा काही दिवसांत मागविण्यात येणार आहे. धरणात पाणी मुबलक प्रमाणात असताना महानगरपालिकेची यंत्रणा नागरिकांना पाणी पुरवठा करण्यात कमी पडणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश यावेळी आयुक्तांनी पाणी पुरवठा विभागाच्या अभियंत्यांना दिले.

उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील पाणी पुरवठा विभागासाठी महत्वाची कामे असणारी शारदानगर, श्रीरामनगर, जे-३ नवीन सिडको, लक्ष्मीनगर, मगनपूरा या ठिकाणी पाणी पुरवठा वाहिनी टाकण्याचे काम पूर्णत्वास येत असून आसना नदी जलाशयावर गेट बसविण्याचे काम प्रगतीपथावर असल्याचे यावेळी शहर अभियंता सुमंत पाटील यांनी सांगितले. त्याचप्रमाणे महानगरपालिकेच्या जलशुध्दीकरण केंद्र व पंप हाऊस येथील सर्व मशिनरीज सुस्थितीत आहेत किंवा नाही? याचा सुध्दा आढावा यावेळी आयुक्तांनी घेतला.

त्याचप्रमाणे पाणी पुरवठा संबंधित प्राप्त तक्रारीचा प्रथम प्राधाण्याने निपटारा करुन नागरिकांच्या अडचणी सोडविण्याच्या सुचना यावेळी आयुक्तांनी उपस्थित अधिकाऱ्यांना दिल्या. नजिकच्या कालावधीत सार्वजनिक बांधकाम विभागा मार्फत शहरातील रस्त्याची कामे हाती घेण्यात येणार असून सदरील कामादरम्यान पाणी पुरवठा वाहिनी क्षतिग्रस्त होणार नाही, याची विशेष खबरदारी घेण्याचे आदेश आयुक्तांनी बैठकीदरम्यान दिले आहेत.

एकंदरीत या बैठकीत महानगरपालिका हद्दीत होणारा दैनंदिन पाणी पुरवठा सुरळीत राहण्यासाठी पाणी पुरवठा विभागातील सर्व अभियंता वर्ग व इतर कर्मचारी वर्गाने दक्ष राहण्याच्या सुचना यावेळी आयुक्तांनी दिल्या आहेत. यावेळी शहरातील नागरिकांनी सुध्दा पाण्याचा वापर काटकसरीने करुन पाण्याची बचत करण्याचे आवाहनासोबतच नागरिकांनी पाणीपट्टी भरण्याचे आवाहन आयुक्तांनी शहरवासियांना केले आहे.

यूपी सरकारला बुलडोझर कारवाई प्रकरणी नुकसान भरपाईचे आदेश

नवी दिल्ली (प्रतिनिधी)– उत्तर प्रदेशात योगी आदित्यनाथ यांच्या नेतृत्वातील भाजपाचं सरकार सत्तेत आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी गुन्हेगारांवर कडक कारवाई करण्याची भूमिका घेतल्याचं अनेकदा पाहायला मिळतं. मात्र, गेल्या काही दिवसांपासून उत्तर प्रदेशातील गुन्हेगारांच्या मालमत्तेवर बुलडोझर कारवाई करण्यात येत असल्यामुळे योगी आदित्यनाथ यांचं सरकार चांगलंच चर्चेत आहे. अनेक गुन्हेगारांच्या मालमत्तेवर बुलडोझर कारवाई करण्यात आल्याचंही पाहायला मिळालं. आता एका प्रकरणातील बुलडोझर कारवाईवरून सर्वोच्च न्यायालयाने उत्तर प्रदेश सरकारला चांगलंच फटकारलं आहे.

प्रयागराजमधील एक वकील, एक प्राध्यापक आणि इतर काहींची घरे २०२१ मध्ये पाडल्याचा आरोप करत सर्वोच्च न्यायालयात एक याचिका दाखल करण्यात आली होती. या याचिकेवरील सुनावणी दरम्यान सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी उत्तर प्रदेश सरकार आणि प्रयागराज विकास प्राधिकरणावर चांगलेच ताशेरे ओढले. तसेच ही कारवाई बेकायदेशीर आणि असंवेदनशील असल्याचं सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे. अशा प्रत्येक प्रकरणात पुढील ६ आठवड्यात प्रत्येकी १० लाख रुपयांची भरपाई देण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने उत्तर प्रदेश सरकारला दिले आहेत.

यावेळी सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं की, देशात कायद्याचं राज्य आहे आणि कोणत्याही नागरिकाचं निवासी घर किंवा बांधकाम अशा प्रकारे पाडलं जाऊ शकत नाही. न्यायमूर्ती अभय एस ओक आणि उज्जल भुयान यांच्या खंडपीठाने या प्रकरणावरील सुनावणी दरम्यान टिप्पणी करताना म्हटलं की ही प्रकरणे आमच्या विवेकाला धक्का देतात.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

बांगलादेश पुन्हा अस्थिर!

बांगलादेश पुन्हा एकदा अस्थिरतेच्या भोवऱ्यात अडकताना दिसत आहे. गेल्या वर्षभरातील राजकीय उलथापालथीनंतर स्थिरता मिळवण्याच्या आशेने बसलेले नागरिक आता नव्या संकटाच्या उंबरठ्यावर उभे आहेत. शेख हसीना यांच्या सरकारची हकालपट्टी आणि मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्त्वाखाली नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर बांगलादेशातील परिस्थिती सुधारेल, अशी अपेक्षा होती. मात्र, सद्यस्थितीत सत्तांतराच्या अफवा, लष्कराच्या हालचाली आणि विद्यार्थी चळवळीतील वाढत्या संघर्षामुळे देश अस्थिरतेच्या दिशेने जात असल्याची चिन्हे आहेत. २६ मार्चला बांगलादेशचा ५३ वा स्वातंत्र्यदिन साजरा झाला. त्याच्या पूर्वसंध्येला मुख्य सल्लागार मोहम्मद युनूस यांनी एका स्थानिक वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत देशात लष्कराने सरकारविरोधात बंड करण्याची अफवा पसरवल्या जात असल्याचा आरोप केला. युनूस यांनी लोकांना या अफवांकडे दुर्लक्ष करण्याचे आवाहन केले. मात्र, सोमवारी बांगलादेशच्या लष्करप्रमुखांनी एक महत्त्वपूर्ण बैठक बोलावली. यात वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांनी सहभाग घेतल्याचे वृत्त आहे. या बैठकीत लष्कराने राष्ट्रपतींवर आणीबाणी लादण्याचा दबाव टाकण्याचा विचार केला असल्याचे बोलले जात आहे. तसेच, मोहम्मद युनूस यांना हटवून लष्कराच्या देखरेखीखाली 'राष्ट्रीय एकता सरकार' स्थापन करण्याचा विचारही चर्चेत आला आहे. बांगलादेशात विद्यार्थी संघटनांची भूमिका कायमच महत्त्वाची राहिली आहे. गेल्या काही महिन्यांत विद्यार्थी चळवळी अधिक तीव्र झाल्या आहेत. सरकारविरोधात वाढलेल्या असंतोषाचा फायदा घेत लष्कर हस्तक्षेप करणार का, हा मोठा प्रश्न आहे. काही दशकांपूर्वीच्या इतिहासावर नजर टाकल्यास, बांगलादेशातील सत्तांतराचे निर्णय अनेकदा हिंसक चळवळींमुळेच घडले आहेत. त्यामुळे आजही परिस्थिती चिंताजनक वाटते. बांगलादेशात लष्करी हस्तक्षेपाची शक्यता नाकारता येत नाही. इतिहास पाहता, पाकिस्तानप्रमाणेच बांगलादेशातही अनेक वेळा लष्कराच्या मदतीने सत्तांतर घडले आहे. बांगलादेशातील लष्करशाहीला पाकिस्तानकडून मिळत असलेल्या पाठिंब्याबाबतही चर्चा सुरू आहे. काही महिन्यांपूर्वीच इस्लामिक स्टेट या दहशतवादी संघटनेच्या सदस्यांनी बांगलादेशात जाऊन तेथील लष्कराला प्रशिक्षण दिल्याचे वृत्त समोर आले होते. अशा स्थितीत, जर बांगलादेशात लष्करशाही प्रस्थापित झाली, तर ती केवळ लोकशाहीसाठीच नव्हे, तर नागरिकांसाठीही घातक ठरेल. भारतातील धोरणकर्त्यांसाठी बांगलादेशातील स्थिती अत्यंत महत्त्वाची आहे. भारताने या विषयावर सावध भूमिका घेतली आहे. मोहम्मद युनूस यांच्या सरकारला भारताने मदत केली असली, तरी कोणत्याही प्रकारच्या हस्तक्षेपापासून भारत सध्या दूर आहे. आता पुढील काही दिवस बांगलादेशच्या राजकीय भवितव्यावर निर्णायक ठरणार आहेत. लोकशाही मार्गाने पुढील सरकार स्थापन होईल की लष्करशाहीचे वर्चस्व निर्माण होईल, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. बांगलादेशच्या अस्थिरतेचा परिणाम संपूर्ण दक्षिण आशियावर होऊ शकतो. त्यामुळे भारतासह संपूर्ण उपखंडाला या घडामोडींवर लक्ष ठेवावे लागेल.

भारतावर ओढावलेले जलसंकट : एक गंभीर आव्हान

पृथ्वीवरील जीवनाचा मूलभूत आधार म्हणजे पाणीपरंतु आज हेच पाणी संपत्तीच्या रुपात दुर्मिळ होत चालले आहे. भारतासह संपूर्ण जगाला जलसंकटाचा सामना करावा लागत आहे. वेगाने वाढणारी लोकसंख्या, अनियंत्रित औद्योगिकीकरण, हवामानबदल, जंगलतोड, भूजलाचा अतिरेकाने वापर आणि अपुरे जलव्यवस्थापन यामुळे ही समस्या दिवसेंदिवस अधिक गंभीर बनत आहे.

भारतामध्ये वाढता जलतुटवडा : वास्तव आणि आकडेवारी

भारतातील जलसंकटाचे स्वरूप समजण्यासाठी काही महत्त्वाची आकडेवारी पाहणे आवश्यक आहे. नीती आयोगाच्या २०१९ च्या अहवालानुसार, भारतात ६० कोटी लोकसंख्या गंभीर जलतुटवड्याला सामोरे जात आहे, तर दरवर्षी सुमारे दोन लाख लोक असुरक्षित पाणी प्यायल्यामुळे मृत्युमुखी पडतात. वर्ल्ड रिसोर्सेस इन्स्टिट्यूटच्या अहवालानुसार, भारत हा पाणीटंचाईच्या बाबतीत जगातील १३व्या क्रमांकाचा देश आहे. भारतात ८०% पाणी शेतीसाठी वापरण्यात येते, मात्र पाण्याचा अपव्यय मोठ्या प्रमाणावर होत आहे. भूजलाचा प्रचंड उपसा केल्यामुळे १९५० पासून आतापर्यंत भूजल पातळी सुमारे ६०% घटली आहे.

जलसंकटाची कारणे

भारतातील जलसंकट वाढण्याची अनेक कारणे आहेत, त्यातील काही महत्त्वाची खालीलप्रमाणे आहेत: १) लोकसंख्येचा वेगाने होणारा वाढ आणि पाण्याची वाढती मागणी हे एक प्रमुख कारण आहे. भारताची लोकसंख्या सध्या १४० कोटीच्या पुढे पोहोचली आहे आणि भविष्यात ती आणखी वाढेल. लोकसंख्यावाढीमुळे पिण्यासाठी तसेच शेती व उद्योगांसाठी पाण्याची मागणी मोठ्या प्रमाणात वाढत आहे.

२) भूजलाचा अतिवापर आणि घटता जलस्तर: भारतातील बहुतांश भागात पाण्याचा प्रमुख स्रोत म्हणजे भूजल. मात्र, शेती, घरगुती आणि औद्योगिक वापरासाठी भूजलाचा मोठ्या प्रमाणात उपसा केला जात आहे, परिणामी भूजल पातळी सातत्याने घटत आहे.

३) अपर्याप्त जलव्यवस्थापन आणि पाण्याचा अपव्यय: भारतासारख्या देशात पाण्याचा वापर अत्यंत अनियंत्रित पद्धतीने होतो. घरगुती वापर, शेती आणि औद्योगिक क्षेत्रात पाण्याचा मोठा अपव्यय होतो.

४) नदी आणि भूजल प्रदूषण: भारताच्या बहुतांश नद्या आणि तलाव औद्योगिक कचरा, प्लास्टिक आणि रासायनिक पदार्थांमुळे दूषित झाल्या आहेत. परिणामी पिण्यायोग्य पाण्याची कमतरता निर्माण होत आहे.

५) हवामान बदल आणि अनियमित पर्जन्यमान: गेल्या काही वर्षांमध्ये हवामान बदलामुळे भारतात अतिवृष्टी, अनियमित पाऊस, सतत दुष्काळ आणि वाढते तापमान यासारख्या समस्या निर्माण झाल्या आहेत. याचा थेट परिणाम जलस्रोतांवर होत आहे.

पारंपरिक जलसंधारण पद्धती आणि त्यांचे महत्त्व

भारतामध्ये प्राचीन काळापासून पाणी साठवण्यासाठी विविध पद्धती अवलंबल्या जात होत्या. आजही त्या अत्यंत प्रभावी ठरू शकतात: तलाव आणि सरोवरे गावोगावी मोठमोठे तलाव आणि सरोवरे तयार करून पाण्याचा साठा केला जात असे. बावड्या आणि कुंड राजस्थान, गुजरात आणि मध्य भारतातील अनेक भागांमध्ये ही जलसंरचनात्मक प्रणाली प्रचलित होती. पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन जमिनीवर पडणारे पावसाचे पाणी मोकळ्या जागांमध्ये साठवून भूजल पुनर्भरण केले जात असे. नदीजोड प्रकल्प मोठ्या नद्यांचे पाणी कमी पाण्याच्या भागांत वळवण्याचे प्रयत्न प्राचीन काळातही केले गेले होते.

आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून जलसंवर्धन

आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जलसंकटावर मात करता येऊ शकते: वर्षाजल संकलन (ठरळप-ुरींशी र्क्रीींशींळपस) गच्चीवरील पाणी संकलित करून भूजल पुनर्भरण करणे. ठिबक आणि फव्वारा सिंचन शेतीमध्ये पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी आधुनिक सिंचन तंत्रांचा अवलंब करणे. सांडपाणी प्रक्रिया आणि पुनर्वापर शहरी भागांमध्ये सांडपाणी प्रक्रिया करून ते शेती किंवा अन्य औद्योगिक उपयोगांसाठी वापरणे. नदी पुनरुज्जीवन प्रकल्प नद्यांच्या जलसंवर्धनासाठी विस्तृत योजना राबवणे.

सरकारी योजना आणि उपक्रम

भारतात जलसंकटावर नियंत्रण मिळवण्यासाठी सरकार विविध योजना राबवत आहे:

१) जल जीवन मिशन प्रत्येक घराला नळाद्वारे शुद्ध पाणी पुरवणे. २) नमामि गंगे योजना गंगा नदीचे पुनरुज्जीवन आणि प्रदूषण नियंत्रण. ३) अटल भूजल योजना भूजल पातळी सुधारण्यासाठी सात राज्यांमध्ये ही योजना राबवली जात आहे. ४) अमृत सरोवर योजना गावोगावी जलस्रोत पुनरुज्जीवित करण्यासाठी ही योजना सुरू करण्यात आली आहे.

सामान्य नागरिकांची जबाबदारी

सरकार आपल्या परीने प्रयत्न करत आहे, पण जलसंकटावर मात करण्यासाठी सर्वसामान्य नागरिकांचाही सक्रिय सहभाग महत्त्वाचा आहे. प्रत्येकाने खालील उपाय अमलात आणले पाहिजेत: घरगुती वापरात पाण्याची बचत करणे. वर्षाजल संकलन यंत्रणा बसवणे. गरज नसताना नळ सुरू ठेवण्याची सवय टाळणे. शेतीमध्ये ठिबक आणि फव्वारा सिंचनाचा अवलंब करणे. प्रदूषण टाळण्यासाठी जलस्रोत स्वच्छ ठेवणे.

भारत आणि संपूर्ण जग सध्या मोठ्या जलसंकटाच्या उंबरठ्यावर उभे आहे. पाणी ही केवळ नैसर्गिक संपत्ती नसून ती आपल्या भविष्यासाठी अनमोल ठेवा आहे. योग्य व्यवस्थापन, वैज्ञानिक उपाययोजना, सरकारी धोरणे आणि लोकसहभागाच्या मदतीनेच जलसंकटावर मात करता येईल. पाणी वाचवा, भविष्य वाचवा! हा विचार प्रत्येकाच्या मनात रुजला पाहिजे, कारण पाणी हे जीवन आहे, आणि जीवनाला पर्याय नाही!

– मच्छिंद्र ऐनापुरे,
जत, जि. सांगली
मो. ७०३८१२१०१२

जिंदगी की मेले...चलते ही रहेंगे!

जन पळभर म्हणतील हाय हाय
मी जाता राहील कार्य काय ?

प्रसिद्ध कवी भा. रा. तांबे. यांच्या कवितेतील या ओळींची शीर्षस्थानी मांडणी यासाठी, की आजच्या भौतिक समृद्धीने नटलेल्या समाजात, नाशवंत देहाला चिकटून बसलेल्या व त्या देहाचे चोचले पुरवणाऱ्या माणसाची अवस्था हास्यास्पद झाली असून, वरील ओळींतून स्पष्ट लक्षात येते की, मनुष्याचे जीवन क्षणभंगुर असून, पृथ्वीतलावरील अनिश्चित गोष्ट जर कोणती असेल तर ती माणसाला लाभलेले औटघटकेचे जीवन. मगे हे असे असूनसुद्धा, आजचा माणूस, हे लाभलेले शरीर कधीच न संपणारी संपत्ती असल्यासारखे जगतो. माणसाला वाटतं, की पृथ्वीतलावरील कार्य मी गेल्यावर संपेल की काय? नेमके हेच आभासी विचाराचे चे पांघरूणवरील ओळी दूर करतात. वास्तव तर हेच आहे की, पृथ्वीच्या किंवा मानव सृष्टीच्या निर्मितीपासू चराचरातील प्रत्येक घटक, अथवा मानव उत्पत्ती, स्थिती व समाप्ती या न्यायाने जगत व मरत असतो. जन्म व मृत्यू ह्या जीवन रुपी नाण्याच्या अटळ वास्तविक बाजू असून, ही गोष्ट लक्षात घ्यायला आजचा आधुनिक माणूस तयार होत नाही. परंतु वास्तवापासून आपण दूर गेलो तरी ते वास्तव मिटणार नसते किंवा सूर्याचा प्रकाश लपवण्यासाठी कितीही पडदा लावला तरी तो प्रकाश आपण लपवू शकत नाही. तद्वतच आपण या क्षणभंगुर शरीरास, जीवनास कितीही चिकटून बसलो, तरी एक दिवस याचा अंत निश्चित आहे . जर हे असे असेल, तर या कवडीमोल देहाचा आपण किती लोभ बाळगावा? त्याच्या मोहात आपण किती काळ अडकावे ? हा चिंतनाचा विषय आहे.

मैं पल दो पल का शायर हू
पल दो पल मेरी कहानी है

ह्या वरील ओळी आपणास या वास्तवाची आठवण करून देतात की जीवनाच्या रंगमंचावरीलआपण वेगवेगळे नट व कलाकार असून, आपली भूमिका आपण वटवत असतो व त्या भूमिकेला एका दिवशी नक्कीच पूर्णविराम लागणार असतो. म्हणून आपल्या जीवनाची कहाणी, अनिश्चित काळासाठी व क्षणाची असते म्हणून या अनिश्चीत असलेल्या जीवनरूपी कथेला, भूमिकेला अनुसरून व स्वीकारून तसेच विनाशी शरीराला चिकटून न राहता, भा. रा. तांबे यांच्या शब्दात सांगायचे झाले तर, आपल्या येण्याने व जाण्याने, पृथ्वीतलावरील कुठलीच कार्य बंद पडत नाही, चंद्र सूर्य व तारका यांचे कार्य अखंड चालू राहते, तसेच माणसाच्या जाण्याने कुठलेच कार्य बंद पडत नसते, म्हणून अविचारी माणसाने ही बाब कटाक्षाने लक्षात घेऊन, जीवन आनंदाने जगून त्यात इतरांना आनंद वाटून, इतरांच्या सुख-दुःखात सहभागी होऊन, आपल्या सकारात्मक कार्याची छाप समाजावर ठेवून एक दिवस या जगाचा निरोप आपल्याला घ्यायचा आहे याचे आत्मभान ठेवून जर हे जीवन जगले, तर माणसाच्या जीवनातील दुःख कमी व्हायला मदत होईल.

कोरोना काळात अनेक माणसे मृत्यूच्या गावाला गेली. ती माणसे गेली म्हणून समाजाचे कार्य बंद पडले नाही. वास्तव तर हेच आहे, की कुणाच्यातरी जाण्याने काही दिवस लोक शोक करतील, आप्त नातेवाईक दुःख व्यक्त करतील, परंतु कुणाचेही जगणे थांबणार नाही म्हणून मनुष्याने नियतीच्या या कठोर वास्तवाच पालन करून, आपल्याला भूमिका वठवण्याठी जेवढा काळ लाभलेला आहे, त्या काळाचा सुंदर व सकारात्मक उपयोग करून जीवन जगले, व भौतिक जीवनास चिकटून विनाशी शरीराचे लाड पुरवण्याच निरर्थक कार्य बंद केल व जीवनाला वैचारिक व वास्तविक दृष्टीने पाहिले तर सत्य हेच आहे की,

ये जिंदगी के मेले
दुनिया मे कम नही होंगे
मगर अफसोस हम नही होंगे

वरील ओळीमध्ये म्हटल्याप्रमाणे, जीवनसृष्टी चालत आलेली आहे, व ती पुढेही तशीच चालत राहील, त्यामुळे प्रत्येकाने जीवन जोपर्यंत आहे तोपर्यंत आनंद वाटावा, आपल्या जीवनातून माणुसकीचे अप्रतिम दर्शन घडवाव. श्रीमंतीत अहंकाराने न माजता, जीवनाला विनम्रतेने जगावे. ही जीवनरूपी यात्रा चालतच राहणार आहे, मात्र हेही तेवढेच निश्चित, की प्रत्येकच यात्रेचा लाभ आपणास घेता येणार नाही, आपणास प्रत्येक यात्रेचा लाभ घेता येणार नाही, याचा अर्थ यात्रा होणार नाही असा निश्चितच होत नाही. म्हणून सृष्टी केवळ आपल्या मुळे आहे, व माझ्यानंतर तिचे काय याची निरर्थक चिंता न करता, मला लाभलेल्या आयुष्यातून मी माझ्या नंतरही लोकांच्या स्मरणात कसा राहील, याकडे लक्ष देऊन आपले कार्य आदर्श बनवण्याचा, प्रांजळ प्रयत्न करणे एवढेच आपल्या हातात आहे. आयुष्याचा पहिला टप्पा जन्म, दुसरा टप्पा जीवन व तिसरा टप्पा मृत्यू असून मधल्या टप्प्याचे सुवर्ण करण्याची संधी आपल्याच हातात आहे.

आपल्या मातृभूमीला लाभलेल्या थोर महापुरूषांची परंपरा आपणास काय शिकवते? तर मनुष्य केवळ शरीराने विनाश पावतो पण त्याचे कार्य व विचार हे अविनाशी व अमर असतात.आपल्या कार्यातून आदर्श चमत्कार घडवल्या शिवाय इतरांच्या मनात नमस्काराची भावना जागृत करता येत नाही. म्हणून, आपल्या जीवनाच गीत गाताना, केवळ आपण एकटेच गायक नाहीत, आपल्या नंतरही या धरतीवरती अनेक गायक येणार आहेत व त्यानंतर ही जीवनाच गीत ते गानारच आहेत.. हे सत्य आहे व ते शाश्वत आहे. डोळ्यांना न दिसणाऱ्या पण मनाला जाणवणाऱ्या कार्याची छाप किंवा कर्तुत्वाचा चमत्कार हा कायमस्वरूपी राहतो. त्यामुळे विनाशी शरीराच्या मोहात न अडकता, वास्तवाचे भान ठेवून समाज उपयोगी कार्य आपल्या हातून घडले, तर ते काळाच्या पडद्यावर कायम राहील. डोळ्यांना दिसणारी प्रत्येक मूर्त बाब, ही विनाशी व लोप पावणार आहे, ही खूणगाठ मनाशी बांधल्यावर या जीवनाचा अनिश्चित प्रवास सुद्धा आनंदी करता येतो. आपल्या नंतर येणाऱ्या पिढीला, आपल्या आदर्श जीवनाची पायवाट घालून दिली, तर ती पायवाट निश्चित अमर असणार आहे,रस्ते कधीच नष्ट होत नसतात तर त्यावरून चालणारी माणसे संपतात, म्हणून वैचारिक अविनाशी रस्ते किंवा वाटा आपण निर्माण करून ठेवल्या तर, पुढच्या पिढीच्या आपण कायम स्मरणात राहू.

कुठल्याच मनुष्याला अमरत्वाचे वरदान लाभलेले नसल्यामुळे, मी अमर राहील या अविर्भावात जीवन जगणे ही धोक्याची घंटा असून, काळाच्या पाऊलखुणा वेळीच लक्षात घेतल्या तर जीवनाचा प्रत्येक क्षण आनंदाने जगता येईल. काळ व मृत्यू यांच्या निष्ठुर जबड्यातून कुणाचीच सुटका होऊ शकत नाही ही बाब माहिती असून सुद्धा ,त्याकडे दुर्लक्ष करून अमरत्वाचे वरदान मिळल्यागत जगणे म्हणजे शुद्ध वेडेपणा होय. त्यामुळे आपण आपल्याला जेवढी भूमिका मिळाली आहे तेवढी प्रांजळपणे निभावत जाणे व आपल्या भूमिकेचा आदर्श पुढच्या पिढीसाठी निर्माण करून देणे, हे एवढे कार्य मात्र आपण निश्चित करू शकतो.अनिश्चित अशा जीवन काळात, महापुरुषांनी युगानुयुगे चालणारे अविनाशी कार्य निर्माण केले आहे, म्हणून अशा प्रकारच्या कार्याला मात्र कधीच अंत नसतो.... हेही तेवढेच खरे.

–प्रा. अमित शिंदे
मु. पो. रोहिपिंपळगाव
ता. मुदखेड, जि. नांदेड
मो. ९७६७८५१०४६

नेपाळमध्ये पुन्हा राजेशाहीचे वारे

नेपाळमधील नागरिक पुन्हा एकदा राजेशाही प्रस्थापित व्हावी यासाठी रस्त्यांवर उतरून आंदोलन करत आहे. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या या आंदोलनाला आता हिंसक वळण लागले असून या आंदोलनादरम्यान झालेल्या हिंसाचारात दोन जणांचा जीवही गेला आहे. जगातील एकमेव हिंदू राष्ट्र असलेल्या नेपाळमध्ये सर्वाधिक काळ राजेशाही होती. नेपाळमध्ये जवळपास २४० वर्षे राजेशाही होती. १९९६ साली पहिल्यांदा नेपाळमधील डाव्या विचारांच्या माओवाद्यांनी राजेशाही विरुद्ध बंड पुकारले आणि देशात लोकशाही प्रस्थापित व्हावी यासाठी आंदोलन झाले.

जगात सर्वत्र लोकशाहीचे वारे असताना नेपाळमध्ये लोकशाहीच असावी अशा विचाराने तरुणांनी देखील माओवाद्यांच्या या आंदोलनाला पाठिंबा दिला. मात्र नेपाळमध्ये राजेशाहीची पाळेमुळे खोलवर रुतली असल्याने या आंदोलनाला लगेच यश मिळाले नाही. २००१ साली नेपाळमध्ये अशी घटना घडली ज्यामुळे राजेशाहीची पाळेमुळेच उद्ध्वस्त झाली. २००१ मध्ये तत्कालीन राजमहालामध्ये नेपाळचे तत्कालीन राजे वीरेंद्र वीर विक्रम शहा आणि त्यांच्या संपूर्ण कुटुंबाची हत्या झाली. या हत्याकांडाने केवळ नेपाळच नाही तर संपूर्ण जग हादरून गेले. या हत्याकांडानंतर ज्ञानेंद्र शहा यांना नवे राजे म्हणून घोषित करण्यात आले. या हत्याकांडानंतर राजेशाही विरुद्ध लोकांच्या मनात चीड निर्माण झाली होती. त्यातच २००५ मध्ये राजे ज्ञानेंद्र यांनी नेपाळची घटना रद्द करून टाकली आणि संसद ही बरखास्त केली त्यामुळे माओवादी आणखी चिडले व त्यांनी उग्र आंदोलने केली त्यांच्या या आंदोलनात लोकशाहीवादीही होते.

माओवादी आणि लोकशाहीवाद्यांनी राजेशाही विरुद्ध थेट एल्गार पुकारला. त्यामुळे २००८ साली २४० वर्षाची राजेशाही उखडून पडली आणि लोकशाही प्रस्थापित झाली. या आंदोलनात जवळपास १६ हजार नागरिकांचा जीव गेला. २००८ साली राजेशाही जाऊन लोकशाही प्रस्थापित झाल्यावर तेथील नागरिकांना वाटले की, लोकशाही मार्गाने आता आपला देश प्रगती करेल. शेजारील भारताने जशी लोकशाही मार्गाने प्रगती केली तशीच प्रगती आपला देशही करेल, पण नागरिकांची ही अपेक्षा फोल ठरली. कारण नेपाळमध्ये लोकशाही प्रस्थापित होऊन देखील नेपाळला स्थिर सरकार मिळू शकले नाही. २००८ ते आतापर्यंत म्हणजे सतरा वर्षात नेपाळमध्ये १४ सरकारे आली. त्यात पुष्लकमल दहल यांचे सरकार तीन वेळा तर के. पी. ओली शर्मा यांचे चार वेळा सरकार आले, पण एकानेही स्थिर सरकार दिले नाही. या सरकारांच्या काळात नेपाळमध्ये भ्रष्टाचार प्रचंड वाढला. छोट्या छोट्या कामांसाठी नागरिकांना पैसे मोजावे लागत. भ्रष्टाचारामुळे या सरकार विरुद्ध जनतेत प्रचंड नाराजी निर्माण झाली. हीच नाराजी हेरून राजे ज्ञानेंद्र यांनी फेब्रुवारीमध्ये एक निवेदन जारी केले. या निवेदनात त्यांनी म्हटले की, राष्ट्र आणि राष्ट्राचे ऐक्य वाचवण्यासाठी सर्वांनी एकत्र येण्याची वेळ आली आहे. राजे ज्ञानेंद यांच्या या निवेदनानंतर नेपाळमध्ये पुन्हा राजेशाही प्रस्थापित व्हावी असे वाटणारा वर्ग रस्त्यावर आला आणि त्यांनी पुन्हा राजेशाही प्रस्थापित व्हावी यासाठी आंदोलन केले.

राजेशाही समर्थकांचे हे आंदोलन कुचलून टाकण्यासाठी तेथील सरकार सर्वोतोपरी प्रयत्न करत आहे. या आंदोलनांमुळे नेपाळमध्ये लगेच राजेशाही प्रस्थापित होईल असे नाही मात्र राजेशाही प्रस्थापित व्हावी असे वाटणारा जो वर्ग आहे त्यांना आशेचा किरण दिसला आहे. तो वर्ग यापुढे ही राजेशाही साठी रस्त्यावर उतरेल. नेपाळमध्ये राजेशाहीचे वारे पुन्हा वाहू लागले आहे हे नक्की.

–श्याम ठाणेदार
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

थोडक्यात...

सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन

नांदेड (प्रतिनिधी)– जिल्हा प्रशासनाच्यावतीने सोमवार ७ एप्रिल रोजी दुपारी १ ते ३ वाजेपर्यंत लोकशाही दिनाचे नियोजन भवन येथे आयोजन केले आहे. या दिवशी महसूल, गृह, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, पाटबंधारे, बांधकाम, परिवहन, सहकार, कृषि विभाग व जिल्हा पाणी पुरवठा समन्वय अधिकारी इत्यादी जिल्हा स्तरावरील प्रमुख अधिकारी व ज्या कार्यालयाचे लोकशाही दिनात प्रलंबीत प्रकरणे आहेत, असे अधिकारी बचत भवन जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात उपस्थित राहतील. सकाळी १२ वाजेपासून निवेदनाची नोंदणी सुरु होणार आहे. त्यानंतर लगेचच प्राप्त झालेल्या अर्जावर, निवेदनावर म्हणणे ऐकून घेण्याच्या कामास सुरुवात करण्यात येईल, अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर यांनी दिली आहे.

'माझी ईकळी शिर्डी झाली' दीर्घकाव्य पुस्तकाचे प्रकाशन

नायगाव बाजार (प्रतिनिधी) – ईकळीमाळ येथील लेखिका श्रीमती सुलोचना गोविंदराव पुयड लिखित दीर्घकाव्य 'माझी ईकळी शिर्डी झाली' या पुस्तकाचे दि.६ एप्रिल रोजी ईकळी माळ येथे प्रकाशन होणार आहे. विज्ञान युगातील या राष्ट्रसंताचे रसाळ चरित्र ईकळी माळ येथील लेखिका श्रीमती सुलोचना गोविंदराव पुयड यांनी कवितेतून सांगितले आहे. उमरी येथील सद्गुरू सदानंद बाबा महाराज समाधी मंदिराचे संस्थानाधिपती अरविंद महाराज यांचा या पुस्तकाला आशीर्वाद लाभला आहे. साधकांसाठी हे स्तोत्र कैवल्यदायी ठरणार आहे. लय, नाद आणि माधुर्याने परिपूर्ण झालेले हे स्तोत्र साधकांसाठी पर्वणीच ठरले आहे.

दक्षिण मतदारसंघात तीन लाख सदस्य करणार

पदाधिकारी, कार्यकर्त्यांच्या बैठकीत आ. बोंढारकर यांना विश्वास

नांदेड (प्रतिनिधी)– येत्या महिन्याभरात नांदेड दक्षिण मतदार संघामध्ये तीन लाख शिवसैनिकांची सदस्य नोंदणी करून विक्रम करू, असा विश्वास आमदार आनंदराव बोंढारकर यांनी व्यक्त केला. तर आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका डोळ्यासमोर ठेवून पदाधिकारी, शिवसैनिकांनी सदस्य नोंदणी करावी, असे आवाहन केले.

शासकीय विश्रामगृहात शिवसेना (शिंदे गट) पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मंगळवारी बैठक आयोजित करण्यात आली होती. त्याप्रसंगी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

आ. बोंढारकर म्हणाले की, गत दोन महिन्यांपूर्वी विधान परिषदेचे गटनेते हेमंत पाटील यांनी सदस्य नोंदणी संदर्भात बैठक घेतली होती. त्यात सविस्तर मार्गदर्शन केले होते. दक्षिण मतदारसंघात जवळपास ५ लाख मतदार आहेत, त्यांच्यापर्यंत शिवसैनिकांनी पोहोचणे गरजेचे आहे. आता हात झटकून कामाला लागा. वार्ड तिथे शाखा, गाव तेथे शाखा निर्माण करा. येत्या महानगरपालिका व जिल्हा परिषद निवडणुका डोळ्यासमोर ठेवून प्रत्येक शिवसैनिकाने सदस्य नोंदणीचे ध्येय ठेवले पाहिजे. जिथे जिथे पदाधिकारी नाहीत, जिथे जिथे शाखा नाहीत, तिथे तिथे पदाधिकारी व शाखाप्रमुखाची निवड करून कामाला सुरुवात करा. येत्या महिन्यात आपल्याला एक लाख सदस्य ऑफलाईन करायची असून दोन लाख सदस्य ऑनलाईन करायचे आहेत. त्यासाठी स्टॉल लावा, बैठका घ्या व इतर कार्यक्रम सुद्धा घेऊन मोठ्या प्रमाणात सदस्य नोंदणीच्या कामाला लागा. संघटना जिवंत तर आपण जिवंत हे लक्षात ठेवून प्रत्येक शिवसैनिकाने जिवाचे रान करावे, असेही आ. बोंढारकर म्हणाले.

यावेळी संपर्कप्रमुख दत्तात्रय पईतवार, जिल्हाप्रमुख विनय पाटील गिरडे, जिल्हासंघटक शंकर पिनोजी, सहसंपर्कप्रमुख गुरमितसिंघ टमना, शहरप्रमुख तुलजेश यादव, तालुकाप्रमुख अशोक मोरे, महिला आघाडी जिल्हाप्रमुख वनमाला राठोड, गीताताई पुरोहित यांच्यासह पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. या मार्गदर्शन बैठकीस मोठ्या प्रमाणात शिवसैनिक, पदाधिकारी संख्येने उपस्थित होते.

महात्मा फुले, डॉ.आंबेडकर संयुक्त जयंती उत्सवाच्या स्वागताध्यक्षपदी आ. केराम

किनवट (प्रतिनिधी)– महात्मा ज्योतिराव फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती उत्सव धडाक्यात साजरा करण्यात येणार आहे. या उत्सवाच्या स्वागताध्यक्षपदी किनवट-माहूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार भीमराव केराम यांची निवड करण्यात आली आहे.

महात्मा फुले यांच्या जयंतीदिनापासून दि. ११ एप्रिलपासून या महोत्सवाला प्रारंभ होणार आहे. ११ एप्रिल रोजी म. फुले यांच्या पुतळ्याजवळ सकाळी ९.३० वाजता ध्वजारोहण करून मानवंदना दिली जाईल. १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीदिनी जेतवन बुद्धविहार येथे ध्वजारोहण आणि भोजनदान होईल. सायंकाळी ५ वाजता जेतवन बुद्धविहारापासून म. फुले आणि डॉ. आंबेडकरांच्या तैलचित्रांची मिरवणूक निघेल. ही मिरवणूक किनवट शहरातील प्रमुख रस्त्यांनी जावून जेतवन बुद्धविहार येथे विसर्जित होईल.

दि.२७ एप्रिल रोजी सायंकाळी हुतात्मा गोंडराजे मैदान येथे जागर संविधानाचा भीम महोत्सव होईल. या महोत्सवात राजाभाऊ शिरसाट यांचा 'भीमा तुझ्या जन्मामुळे', प्रा. अविनाश नाईक प्रस्तुत 'गाथा म हासूर्याची' आणि भीम शाहीर नागसेनदादा सावदेकर यांचा भीमगीतांचा कार्यक्रम होईल. नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते या महोत्सवाचा शुभारंभ होईल. बाळासाहेब ठाकरे हळद संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे अध्यक्ष आ. हेमंत पाटील हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहतील. पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे अध्यक्ष जोगेंद्र कवाडे, एकतावादी रिपब्लिकन पक्षाचे नेते भैय्यासाहेब इंदिसे, लघु उद्योग विकास महामंडळाचे उपाध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) जयदीप कवाडे, हदगावचे आमदार बाबुराव कोहळीकर, आदिलाबादचे खासदार नागेश गोडाम, पांढरकवडा - केळापूरचे आमदार राजू तोडसाम यांची यावेळी प्रमुख उपस्थिती राहील, अशी माहिती म. फुले-डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष विनोद भरणे यांनी दिली आहे.

नागापूर शाळेतील विद्यार्थ्यांचा गुणवत्तेचा संकल्प; गुढीपाडव्याला तयार केले आकर्षक भेटकार्ड

नांदेड (प्रतिनिधी)– गुढीपाडवा हा महाराष्ट्रातील अत्यंत महत्त्वाच्या सणांपैकी एक आहे. गुढी पाडवा हा सण हिंदू पंचांगाप्रमाणे चैत्र शुद्ध प्रतिपदेला म्हणजेच वसंत ऋतूच्या पहिल्या दिवशी साजरा केला जातो. नांदेड तालुक्यातील ग्रामीण भागातील वाजेगाव केंद्र अंतर्गत असणाऱ्या नागापूर या गावातील जिल्हा परिषदेच्या विद्यार्थ्यांनीदेखील हा सण आगळ्या वेगळ्या पद्धतीने साजरा केला आहे. येथील विद्यार्थ्यांनी गुढी पाडव्याच्या अतिशय सुंदर कलाकृती तयार करून, आकर्षक भेटकार्ड तयार केले.

ग्रामीण भागात तर शेतीच्या व्यवहाराच्या दृष्टीने नवीन आर्थिक वर्षाची सुरुवात या दिवशी होत असते. या दिवशी शेतात शेतकऱ्यांकडून औताची पूजा केली जाते. तसेच ग्रामीण तथा शहरातदेखील प्रत्येकजण आपल्या घरी गुढी उभारून मराठी नववर्षाचे उत्साहाने स्वागत करतात. शालिवाहन संवत्सराचा हा प्रथम दिवस साडे तीन शुभ मुहूर्तांपैकी एक असतो. या दिवशी अनेक जण नवीन वस्तू, घर, सोने खरेदी जाणीवपूर्वक करतात.

संपूर्ण महाराष्ट्रात निपुण महाराष्ट्र नावाचे पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान विकसित करणारे अभियान सुरू आहे, त्यात १००% गुणवत्तेची गुढी उभारून सर्व विद्यार्थी निपुण करण्याचा संकल्प वाजेगाव केंद्र अंतर्गत असणाऱ्या नागापूर या गावातील जिल्हा परिषद शाळेने केला आहे. या संकल्पपूर्तीसाठी नांदेड मनपा शिक्षणाधिकारी अधिकारी व्यंकटेश चौधरी, केंद्रप्रमुख व्यंकट गंदपवाड यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्याध्यापक अक्षय ढोके, सहशिक्षक गोपाळ राजेबोईनवाड, सहशिक्षिका धम्मदिना सोनकांबळे परिश्रम घेत आहेत.

ईदनिमित्त मुदखेडमध्ये सामूहिक नमाजमध्ये विश्वशांतीची प्रार्थना

मुदखेड (प्रतिनिधी) – रमजान पवित्र महिन्याची सांगता ईद -उल -फित्रने उत्साहात करण्यात आली आहे. रमजान ईदनिमित्त सोमवारी (दि.३१) ईदगाह मैदानावर देशात समृद्धी व सामाजिक एकात्मता आबादीत राखण्यासाठी अल्लाहकडे प्रार्थना करण्यात आली. हिंदू मुस्लिम बांधवांनी शीरखुर्माचा स्वाद घेत भाईचारा जोपासला आहे.

रमजान ईदनिमित्त सोमवारी (दि.३१) ईदगाह मैदानावर सामूहिक नमाज अदा करण्यात आली. यात देशाची समृद्धी व सामाजिक एकात्मतेसाठी अल्लाहकडे साकडे घालण्यात आले. हाफिज मेहराऊल हसन यांनी नमाज अदा केली. तालुक्यातील बारड, पार्डी, शेम्बोली, निवघा, मेंढका आदी गावात मुस्लिम व हिंदू बांधवांनी एकमेकास आलिंगण देऊन शुभेच्छा दिल्या. खासदार रवींद्र चव्हाण यांनी काँग्रेस कार्याध्यक्ष मोहंमद गौस, माजी उपनगराध्यक्ष करीम खान साब, अल्पसंख्यांक शहराध्यक्ष इक्बाल कुरेशी, मौलाना अब्दुल कलाम शाळेचे संस्थापक रशीद मुलतानी, अल्पसंख्यांक काँग्रेस कमिटी तालुकाध्यक्ष सय्यद तोफीक, यांच्या निवासस्थानी भेट दिली. यावेळी काँग्रेस जिल्हा कार्याध्यक्ष पप्पू पाटील कोंढेकर, काँग्रेस कमेटी शहर अध्यक्ष कैलास गोडसे, युवा काँग्रेस जिल्हाध्यक्ष बालाजी गाडे, माजी नगरअध्यक्ष राज बहादूर कोत्तवार, काँग्रेस कमिटी तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख, माधव हामंद, ॲड. संदीप देशमुख बारडकर, अतिक अहेमद, युवक काँग्रेस तालुकाध्यक्ष प्रशांत पाटील मुंगल, शहरअध्यक्ष मुजीब पठाण, राजू चौदंते यांची प्रमुख उपस्थिती होती.

खा. रवींद्र चव्हाण यांनी मुस्लिम बांधवाना शुभेच्छा देऊन शहराच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नसल्याचे सांगितले. यावेळी रेल्वे संदर्भातील प्रश्नाकडे लक्ष वेधले असता ते सोडण्यासाठी कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी गिरीष कोतावार, शिवानंद देवके, सूर्यकांत चौदंते, अविनाश चौदंते, आकाश सोनटक्के, विश्वनाथ पवार निवघेकर,बळवंत पाटील खुजडेकर, संजय बोकेफोड, ऋषिकेश चौदंते, बाळू क्षीरसागर, जनार्धन चौदंते, यशवंत रणखांबे, दादाराव पूयड नागेलीकर, दादा कल्याने, भगवान पवार निवघेकर, साहेबराव गोरखवाड, शंभु पवार, सुमित चव्हाण, बालाजी ढगे, माजी नगरसेवक बबलू सेट, लतीफ भाई, इरफान माहेबूब साब, युसूफ भाई सदर, इदरिस भाई, शरीफ बागवान, खादीर भाई, सालीम भाई यांच्यासह काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

चांदू कल्याणकर यांचे निधन

नांदेड (प्रतिनिधी)– तरोडा खुर्द येथील चांदू बाबाराव कल्याणकर (वय ५५) यांचे मंगळवारी दि. १ एप्रिल रोजी उपचारादरम्यान अल्पशा आजाराने निधन झाले.

स्व. चांदू बाबाराव कल्याणकर यांच्या पार्थिवावर मंगळवारी (दि. १) सायंकाळी तरोडा खुर्द येथील समशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. चांदू कल्याणकर यांच्या पश्चात आई, भाऊ प्रभू कल्याणकर, दोन मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

नांदेड- हजरत निझामुद्दीन उन्हाळी विशेष गाडीच्या २६ फेऱ्या होणार

नांदेड (प्रतिनिधी)– दक्षिण मध्य रेल्वेने प्रवाशांची गर्दी लक्षात घेवून नांदेड - निझामुद्दीन - नांदेड विशेष गाडीच्या २६ फेऱ्या चालविण्याचे नियोजन केले आहे.

गाडी क्रं.०७६२१ हजूर साहिब नांदेड - हजरत निझामुद्दीन विशेष गाडी दि. ५ एप्रिल ते २८ जून दरम्यान दर शनिवारी सकाळी ८.४५ वाजता सुटेल आणि पूर्णा, परभणी, सेलू, परतूर, जालना, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मनमाड, जळगाव, भुसावळ, खंडवा, इटारसी, भोपाल, ऊना, झांसी, ग्वालियर, आग्रा, मथुरा, पालवल मार्गे हजरत निझामुद्दीन येथे रविवारी दुपारी २ वाजता पोहोचेल.

गाडी क्रं.०७६२२ हजरत निझामुद्दीन ते हजूर साहिब नांदेड विशेष गाडी दि. ६ एप्रिल ते २९ जून दरम्यान दर रविवारी रात्री ९.४० वाजता सुटेल आणि आलेल्या मार्गानेच हजूर साहिब नांदेड येथे मंगळवारी मध्य रात्री १२.३५ वाजता पोहोचेल. या गाडीत स्लीपर आणि वातानुकुलीत असे १५ डब्बे असतील.

या गाडीचे आरक्षण दि. ३० मार्च रोजी सकाळी ८ वाजता सुरु होत आहे. गाडी क्रं.०७०६१ हैदराबाद ते भावनगर विशेष गाडीला दि. ४ एप्रिल ते २७ जून दरम्यान मुदतवाढ देण्यात आली आहे. ही गाडी पूर्वीच्या वेळापत्रकानुसारच धावेल. गाडी क्रं.०७०६२ भावनगर ते हैदराबाद विशेष गाडीला दि.६ एप्रिल ते २९ जून दरम्यान मुदतवाढ देण्यात आली आहे. ही गाडी पूर्वीच्या वेळापत्रकानुसारच धावेल. गाडी क्रं. ०७०६१ हैदराबाद ते भावनगर विशेष गाडीचे आरक्षण दि.३० मार्च रोजी सकाळी ८ पासून सुरु झालेले आहे.

जायकवाडी वसाहतीच्या जमीन गैरव्यवहारप्रकरणी अधिकाऱ्यांची चौकशी करण्याची मागणी

लोहा (प्रतिनिधी) – लोहा शहरातील जायकवाडी वसाहतीची जमीन भूमाफियाशी मिलिभगत करुन हडप करणाऱ्या कार्यकारी अभियंत्यांची ईडी मार्फत चौकशी करावी, त्यांना तात्काळ निलंबित करावे अशी मागणी येथील पँथर नेते बबनराव निर्मले व नगरसेविका सौ. शारदा निर्मले यांनी विभागीय आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनानुसार, ३ हेक्टर १७ आर जायकवाडी वसाहत येथे भूसंपादन प्रकरणाचा २/३ रकमेचा दावा कोर्टात चालू असताना मूळ मालकांनी विक्री केलेल्या थर्ड पार्टी भूमाफिया, शासकीय जमिनी हडप करणाऱ्या टोळी सोबत संगणमत करून भूभाडे पोटी १३.५० कोटी रुपये सुप्रीम कोर्टात अपील न करता थर्ड पार्टीस चेक द्वारे / धनादेशाद्वारे अदा करून शासनाची फसवणूक केली. त्यामुळे शासनाची लुबाडणूक केल्याप्रकरणी लाचखोर कार्यकारी अभियंत्यावर फौजदारी गुन्हा दाखल करून अदा केलेले तेरा कोटी पन्नास लाख रुपये वसूल करावेत. तसेच त्यांना तत्काळ निलंबित करून त्यांनी जमवलेल्या बेहिशोबी मालमत्तेची ईडीमार्फत चौकशी करावी, अशी मागणी अशी मागणी पँथर नेते बबनराव निर्मले व नगरसेविका सौ. शारदा निर्मले यांनी विभागीय आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

हायवा ट्रकखाली चिरडून एकाचा मृत्यू; नवीन कौठा भागातील घटना

नांदेड (प्रतिनिधी)– नवीन कौठा परिसरात असलेल्या बॉम्बशोधक व नाशक पथक कार्यालयासमोर शुभम वाघमारे याचा हायवा ट्रकखाली चिरडून जागीच मृत्यू झाला. ट्रक चालकाविरुद्ध नांदेड ग्रामीण ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा अपघात ३१ मार्च रोजी सायंकाळी साडेसातच्या दरम्यान झाला होता.

कौठा येथील शुभम नागेश वाघमारे (वय २९) हा दुचाकीने (एमएच २६-बीपी- ९३७३) बॉम्बशोधक व नाशक पथक कार्यालयासमोरून घराकडे येत होता. यावेळी हायवा ट्रकचा (एमएच २६ बीई ७९७१) चालक साहेबराव निवृत्ती देटवे (रा. लालवाडी फत्तेपुर नांदेड) याने शुभम वाघमारे याच्या दुचाकीस जोरात धडक दिली. यात शुभम वाघमारे चाकाखाली आल्याने चिरडून त्याचा जागीच मृत्यू झाला. डॉ. व्यंकटेशप्रसाद साहेबराव मामीलवाड यांच्या फिर्यादीवरून नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात साहेबराव देटवेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस उपनिरीक्षक गायकवाड करत आहेत.

घटनेनंतर पळून जाणाऱ्या चालकास पाठलाग करुन पकडले

ही घटना घडली त्यावेळी उस्मानगर पोलीस स्टेशनचे पोलीस हवालदार सुशील कुबडे आणि जिवीशाचे चालक प्रविण अमीलकंठवार तिथेच थांबलेले होते. सदरची घटना घडल्याची लक्षात येताच पळून जाणाऱ्या वाहन चालकास पाठलाग करुन त्यास मामा चौकाच्या अलीकडे पोलीस हवालदार सुशील कुबडे आणि जिवीशाचे चालक प्रविण अमीलकंठवार यांनी पकडले.

अन्यायग्रस्त विद्यार्थ्यांना त्वरित न्याय द्या -राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस

नांदेड (प्रतिनिधी)– स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने एम.ए. समाजशास्त्र (प्रथम सत्र) परीक्षेच्या निकालात मोठी चूक करत असंख्य विद्यार्थ्यांना अनुपस्थित दर्शवले आहे. या विद्यार्थ्यांना न्याय द्या, अन्यथा तीव्र आंदोलन करू असा इशारा राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसने निवेदनाद्वारे दिला आहे.

विद्यार्थी प्रत्यक्ष परीक्षेला हजर होते, तरीही चुकीच्या निकालामुळे त्यांचे पुढील शिक्षण धोक्यात आले आहे. आणि परीक्षा आवेदन पत्र भरण्यासाठी फक्त दोन दिवस सुटले आहेत. त्यामुळे त्यांना परीक्षेचे आवेदन पत्र भरण्यासाठी पण सूट द्यावी, अशी मागणी ष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष फैसल सिद्दिकी, अमितसिंघ सुखमणी, रोहित पवार, मोहसीन खान, लकीसिंघ जागीरदार, अभिषेक शिंदे यांनी केली आहे.

तक्रार निवारण दिनी ३३४ अर्ज निकाली

स्थानिक ५४, वरिष्ठ २८० तक्रारींचा समावेश : दर शनिवारी आयोजन

नांदेड (प्रतिनिधी) – पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या निर्देशानुसार जिल्ह्यात २३ मार्च ते २९ मार्च दरम्यान तक्रार निवारण मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेला नागरिकांचा मोठा प्रतिसाद लाभला असून स्थानिक पातळीवरील ६५ तर वरीष्ठ पातळीवरील २८० असे एकूण ३३४ तक्रारींचे निराकरण करण्यात आले.

पोलीस अधिक्षस अबिनाश कुमार यांनी जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांना नागरिकांच्या तक्रार निवारणाच्या अनुषंगाने मोहिम राबविण्या बाबत आदेश दिले होते. नागरिकांचे अर्ज वेळेत निकाली काढणे बंधनकारक असल्याने दि. २३ मार्च ते दि. २९ मार्च दरम्यान जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशन येथे तक्रार निवारणाची मोहिम राबविण्यात आली. त्यामध्ये जिल्ह्यात स्थानिक ५४ व वरिष्ठ २८० असे एकूण

३३४ अर्ज निकाली काढण्यात आले आहेत.

आता यापुढे दर शनिवारी तक्रार निवारणाची मोहिम राबविण्यात येणार आहे. नागरीकांनी या मोहिमेचा लाभ घ्यावा, असे आवाहन पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी केले आहे. सदरची कामगिरी सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी नांदेड, तसेच सर्व पोलीस स्टेशनमधील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी केली आहे.

पारडी येथे अखंड हरिनाम सप्ताह तथा श्रीमद् भागवतकथा ज्ञानयज्ञ सोहळ्यास प्रारंभ

लोहा (प्रतिनिधी) – प्रतिवर्षी प्रमाणे याही वर्षी विठ्ठलेश्वर मंदिर पारडी येथे रविवारी दि.(३० मार्च) अखंड हरीनाम सप्ताह तथा श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याला प्रारंभ झाला. कथा प्रवक्ते भागवताचार्य श्री हभप शंकर महाराज लोंढे सोनमांजरीकर यांच्या रसाळ व मधुर वाणीतून सलग सात दिवस ज्ञानयज्ञ सोहळा होत आहे.

सप्ताहात दैनंदिन कार्यक्रम काकडा, ज्ञानेश्वरी पारायण, तुकाराम महाराज गाथा भजन, श्रीमद् भागवत कथा, महाप्रसाद, हरिपाठ, हरि किर्तन, जागर, भारूडे, संगीत भजन आदी कार्यक्रम होत आहेत.

तसेच काकडा भजन पहाटे, ज्ञानेश्वरी पारायण, तुकाराम महाराज गाथा भजन, श्रीमद् भागवत कथा, महाप्रसाद आदी दैनंदिन कार्यक्रम होत आहेत.

रविवारी दि. (३० मार्च) हभप गोविंद महाराज राऊत देऊळगावकर, सोमवारी (दि.३१) हभप डॉ. अशोक महाराज परभणीकर, मंगळवारी (दि.०१) उद्धव महाराज रहाटीकर यांचे हरि किर्तन संपन्न झाले.

बुधवारी दि.(०२) हभप संदीप महाराज आळंदी दे., गुरुवारी (दि.०३) हभप श्री परमेश्वर महाराज कंधारकर, शुक्रवारी (दि.०४) हभप दिपक गुरू पांगरेकर, शनिवारी (दि.०५) हभप श्री गंगाधर महाराज खैरे वसमत यांचे किर्तन होणार आहे. रविवारी (दि. ६) हभप लक्ष्मीकांत महाराज लोहेकर यांच्या काल्याचे किर्तन कार्यक्रमाचा समारोप होणार आहे. भक्तांनी या कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन समस्त पारडी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

निरोगी आरोग्याचा कानमंत्र

निरामय

चुकीच्या पद्धतीने आंबा खाणं ठरेल जीवघेणं

आंबे खाण्यापूर्वी किमान १ तास पाण्यात भिजवले पाहिजेत. रिसर्चमध्ये असे सांगितले की, जेव्हा तुम्ही आंबा पाण्यात भिजवता तेव्हा जास्तीचे फायटिक ॲसिड तुटले जाते आणि संभाव्य नुकसानांपासून संरक्षण होते. फायटिक ॲसिड हा घटक शरीरात गेल्यानंतर लोह, जस्त आणि कॅल्शियम इत्यादींचे शोषण कमी करतो. यामुळे शरीराला हे घटक मिळत नाहीत आणि अशक्तपणा, कमकुवत हाडे आणि झिंकची कमतरता होऊ शकते. काही लोकांच्या शरीराचे तापमान जास्त असते. थोडासा आंबा खाल्ल्यानंतरही पिंपल्स, ॲलर्जी, स्किन इन्फेक्शन होऊ लागते. पोषणतज्ज्ञांच्या मते, भिजवलेले आंबे खाल्ल्याने शरीरातील उष्णता वाढत नाही. काही संशोधनात फायटिक ॲसिडच्या फायद्यांबाबत देखील सांगितले आहे. ते दावा करतात की, मध्यम प्रमाणात ते ॲंटिऑक्सिडेंट म्हणून कार्य करते. ज्यामुळे इन्सुलिनचा प्रतिकार होतो आणि मधुमेह टाळता येतो.

मोसंबीचे फायदे अनेक

मोसंबी हे फळ तुम्हाला देखील माहीत आहे. मोसंबीचा रस तर कित्येकांचा खूप आवडता सुद्धा असतो. तसं पाहिलं तर आपण मोसंबीकडे एक भारी चव असणारे गोड फळ म्हणूनच पाहतो. पण मोसंबी त्यापेक्षा सुद्धा खूप काही हे बरं का! हे फळ लिंबूवर्गीय फळांमध्ये येते, म्हणून याला गोड लिंबू असे सुद्धा म्हणतात. मोसंबीचा आकार सुद्धा तुम्ही पाहिला तर काहीसा लिंबू सारखाच असतो. या मोसंबीमध्ये अनेक पोषक तत्वे आणि व्हिटॅमिन्स असतात. यात आम्ल खूप कमी प्रमाणात असते. मोसंबीच्या एका फळामध्ये ५० मिलीग्रॅमपर्यंत व्हिटॅमिन सी असते जे दैनिक आहाराच्या गरजेच्या जवळपास २२ टक्के आहे. हेल्थ एक्सपर्ट तर मोसंबीचे फळ किंवा मोसंबीचा ज्यूस रोज पिण्याचा सल्ला देतात. कारण हे फळ आरोग्याला सुद्धा खूप फायदेशीर आहे आणि म्हणूनच श्रीमंतांच्या घरात ब्रेकफास्टला मोसंबीचा रसच असतो.

- कोणकोणते व्हिटॅमिन्स असतात? : आता तुम्हाला देखील प्रश्न पडला असेल की मोसंबीमध्ये खूप सारे व्हिटॅमिन्स असतात हे मान्य पण हे व्हिटॅमिन्स नक्की असतात कोणकोणते? चला जाणून घेऊया. व्हिटॅमिन सी सोबतच मोसंबीमध्ये व्हिटॅमिन ए, कॅल्शियम, कार्बोहाइड्रेट, फास्फरस, पोटॅशियम, फोलेट ही तत्वे असतात. याशिवाय फळामध्ये ॲंटीऑक्सीडेंट, ॲंटीबॅक्टेरियल, ॲंटीफंगल, ॲंटी-ट्यूमर, ॲंटी-डायबिटिक, ॲंटी-अल्सर असे अनेक औषधी गुणधर्म सुद्धा असतात.
- स्कीन हेल्दी राहते... : मोसंबीमध्ये व्हिटॅमिन सी मोठ्या प्रमाणात असते. हे व्हिटॅमिन कॉलेजन नावाचे प्रोटीन बनवण्यासाठी आवश्यक असते. यामुळे त्वचा टाईट आणि मजबूत राहते. यशिवाय यातील ॲंटीऑक्सिडेंट गुणधर्म संबंधित त्वचा बदलांशी लढा देतात आणि त्वचेचे रक्षण करण्यात मदत करतात. यशिवाय हे चेहऱ्यावरील डाग आणि पिंपल्स यांवर सुद्धा प्रभावी ठरतात. मोसंबीमध्ये असणारे ॲंटीऑक्सिडेंट आणि ॲंटीबायोटिक गुणधर्म त्वचेला संक्रमणापासून वाचवण्याचे सुद्धा काम करतात.
- कॅन्सरचा धोका होतो कमी... : मोसंबीमध्ये लिमोनॉइड्स नावाचे एक योगिक आढळते, जे काही प्रमाणात कॅन्सरचा धोका कमी करू शकते. एका रिसर्च पेपरमध्ये सांगितले की मोसंबीमध्ये आढळणारे ॲंटी-कॅन्सर गुणधर्म मुख्यतः लिव्हर कॅन्सर, ब्रेस्ट कॅन्सर आणि पोटातील ट्युमरच्या धोक्याला कमी करण्याचे काम करतात. तर मंडळी, हा मोसंबीचा सगळ्यात मोठा फायदा म्हणायला पाहिजे. तुम्हाला सुद्धा कॅन्सरपासून स्वतःचा बचाव करायचा असेल आणि हेल्दी राहायचे असेल तर आवर्जून मोसंबी खा.
- पचनसाठी फायद्याची मोसंबी : मोसंबीमध्ये फ्लेवोनॉइड्सची एक हाई-कंटेंट वॅल्यू असते जी पचन रस, ॲसिड आणि पित्ताच्या स्त्रावाला वाढवून पचन तंत्राला सक्रीय करते. अशावेळी पोटात तयार झाले आम्ल पाचक रसांना रोखून पचनात मदत करतात. आणि एवढेच नाही तर उत्सर्जन प्रणालीच्या माध्यमातून विषारी पदार्थ सुद्धा बाहेर फेकले जातात. जर तुम्हाला पचनाचा त्रास असेल तर आवर्जून मोसंबीचे सेवन करा. तुमच्या आसपास कोणाला पचन संबंधी समस्या असतील तर त्यांना देखील नक्की मोसंबी खायला सांगा.
- कोलेस्ट्रॉल कंट्रोल : कोलेस्ट्रॉलचा स्तर नियंत्रित राखण्यासाठी सुद्धा मोसंबी खाण्याचा सल्ला जाणकार देतात. मोसंबीच्या ज्यूस मध्ये एंटी-हाइपरलिपिडेमिक म्हणजेच हाय कोलेस्ट्रॉल कमी करण्याचा प्रभाव असतो. अशावेळी रजर तुम्हो रोज मोसंबीचे सेवन केले तर शरीरातील कोलेस्ट्रॉलचा स्तर नियंत्रित राहू शकतो.

हे आहेत अन्य फायदे

मोसंबीचे अन्य फायदे देखील आहे. याशिवाय मोसंबी अनेक आजारांवर सुद्धा रामबाण समजले जाते. कावीळ, दमा, अर्थराइटिस यांसारख्या आजारांसाठी मोसंबीचे सेवन जरूर करावे. तसेच इम्युनिटी वाढवायची असेल तर त्यात सुद्धा मोसंबीचे फळ मदत करू शकते.

खरबूज खाण्याचे जबरदस्त फायदे

उन्हाळ्याच्या दिवसात तब्येतीची काळजी घेणं महत्वाचं आहे. कारण गंभीर आजार पसरण्याचाही धोका असतो. लहान सहान गोष्टीतील निष्काळजीपणा गंभीर आजार पसरण्याचं कारण ठरू शकतो. गरमीच्या दिवसांत जास्तीत जास्त पाणी पिऊन हायड्रेट राहणं गरजेचं आहे. डाएटचाही आहारात समावेश करावा. उन्हाळ्याच्या दिवसात आहारात हेल्दी फूड्स आणि ज्यात पाण्याचे प्रमाण अधिक असते अशा पदार्थांचे सेवन करावे.

- खरबुजात प्रथिने, कर्बोदके, पाणी, फॉस्फरस, लोह, पोटॅशियम, फायबर, मॅग्नेशियम, जस्त, सोडियम, विविध जीवनसत्त्वे, थायामिन आदी पोषक घटक असतात.
- फायबर आणि पाण्याचे प्रमाण जास्त असते, म्हणून ते अपचन, बद्धकोष्ठता, गॅस किंवा पाचन तंत्राच्या इतर समस्या असलेल्या लोकांसाठी नैसर्गिक उपाय म्हणून कार्य करते.
- खरबूजाचे नियमित सेवन केल्यास हृदयाशी संबंधित आजारांचा धोका टाळता येतो. फॉलिक ॲसिड खरबूजमध्ये आढळते, ते रक्तवाहिन्यांमध्ये रक्त गोठणे किंवा गुठळ्या तयार होण्यास प्रतिबंध करण्यास मदत करते. त्याच्या वापराने हृदय निरोगी ठेवता येते.

- उन्हाळ्यात जास्त तेलकट मसाल्यांचे सेवन केल्याने पोट खराब होऊ शकते. त्यामुळे या काळात हलक्या वस्तूंचे सेवन करावे. यात भरपूर फायबर असते. जे बद्धकोष्ठतेच्या समस्येपासून मुक्त होण्यास मदत करू शकतात.
- खरबुजाचे सेवन डोळ्यांसाठी खूप फायदेशीर मानले जाते. व्हिटॅमिन ए बीटा-कॅरोटीन कॅनटालूपमध्ये आढळते जे डोळ्यांची दृष्टी वाढवण्यास आणि मोतीबिंदूचा धोका कमी करण्यास मदत करते.
- जर तुम्ही किडनी स्टोनच्या समस्येने त्रस्त असाल तर खरबूज खा. खरबूजमध्ये भरपूर पाणी आणि ऑक्सीकिनिन असते. ज्यामुळे किडनी स्टोनची समस्या दूर होण्यास मदत होते.
- मधुमेहाच्या रुग्णांसाठी मर्यादित प्रमाणात याचे सेवन करणे फायदेशीर ठरू शकते. खरबूजमध्ये असलेले एडेनोसिन रक्त पातळ करण्याचे काम करते. यामुळे हृदयाशी संबंधित अनेक आजारांचा धोका कमी होऊ शकतो.
- खरबूज खाल्ल्याने शरीर निरोगी राहते आणि व्हायरस, बॅक्टेरियाच्या संसर्गापासून दूर राहते. खरबूजमध्ये व्हिटॅमिन सी आढळते, त्याच्या वापरामुळे रोग प्रतिकारशक्ती मजबूत केली जाऊ शकते.
- खरबूजाच्या फळापासून ते त्याच्या बियांपर्यंत सर्व भाग आरोग्यासाठी अत्यंत आरोग्यदायी असतात. जर खरबूज योग्य प्रमाणात आणि योग्य पद्धतीने खाल्ले तर ते शरीराला अनेक आजारांपासून वाचवू शकते. त्याचा गर आणि बियांची पेस्ट बनवून फेसमास्क म्हणूनही त्याचा वापर केला जाऊ शकतो. त्वचेशी संबंधित समस्या जसे की डाग, कोरड्या त्वचेची लक्षणे दूर करते.
- उच्च रक्तदाबाने ग्रस्त असलेल्या लोकांना त्यांच्या आहारात या फळाचा समावेश करण्याचा सल्ला दिला जातो, कारण हे पोटॅशियम समृद्ध फळ रक्तवाहिन्यांना आराम देते आणि रक्त सुरळीतपणे वाहण्यास मदत करते.

आंबाच नव्हे तर कोयसुद्धा फायद्याची

आंबा खाल्ल्यानंतर त्याची कोय तुम्ही फेकून देता का? आंबा खाण्याचे अनेक फायदे तुम्ही ऐकले, वाचले असतील, पण कोयीचे फायदेही आहेत हे तुम्हाला माहितीय का? आंबा जितका आरोग्यासाठी फायद्याचा आहे तितकीच आंब्याची कोयसुद्धा तब्येतीसाठी उपयुक्त ठरते. आंब्याच्या कोयीमध्ये अनेक औषधी गुणधर्म असून त्याचा फायदा आपल्या आरोग्यासाठी होतो. अनेक आजारांवर आंब्याच्या कोयीची पावडर औषध म्हणून उपुक्त आहे. आंब्याच्या कोयीची पावडर करून त्याचा वापर केल्यास अनेक आजारांचा धोका कमी होऊ शकतो. आंब्याच्या कोयीमध्ये अनेक पोषक तत्वे असतात. भारतात अनेक ठिकाणी वेगवेगळ्या आंब्याच्या प्रजाती असून त्या प्रसिद्ध आहेत. आंब्यात मिनरल्स, व्हिटॅमिन, एंटिऑक्सिडंट यांचं प्रमाण भरपूर असतं. त्यामुळेच आंबा हा आरोग्यासाठी फायद्याचा मानला जातो.

- पावडर कशी तयार करतात? : आंब्याच्या कोयीची पावडर आरोग्यासाठी लाभदायक ठरू शकते. कोयीच्या आत असलेल्या भागापासून ही पावडर तयार करण्यात येते. तो भाग वाळवून आणि खिसून त्याची पावडर तयार केली जाते. या पावडरमध्ये औषधी आणि पोषक अशी तत्वे असतात ज्याचा आरोग्याला फायदा होतो.
- पोटाची तक्रार होते दूर : पोटाची तक्रार असलेल्यांना आंबा आणि आंब्याची कोय खूपच फायदेशीर ठरते. आंबा आणि आंब्याच्या कोयीची पावडर ही अनेक व्हिटॅमिन्सनी भरलेली असते. या पावडरचं सेवन केल्यानं अनेक आजारांपासून तुमचा बचाव होऊ शकतो. पोटाची तक्रार असल्यास त्यापासून दिलासा मिळतो. इतकंच नाही तर इतरही अनेक फायदे आंब्याच्या कोयीपासून बनवलेल्या पावडरचे तुम्हाला होतील.
- मधुमेहींसाठी फायद्याची : मधुमेह असलेल्या व्यक्तींसाठी आंब्याच्या कोयीची पावडर फायद्याची ठरते. रक्तातील साखर नियंत्रणात ठेवण्यासाठी आंब्याच्या कोयीची पावडर उपयुक्त ठरते. आंब्याच्या कोयीच्या पावडरमध्ये फायबर भरपूर असते. फायबरच्या सेवनामुळे पचनक्रिया संथ होते. त्यामुळे रक्तातील साखरेची पातळी कमी राहण्यास मदत होते.
- मेटॅबॉलिज्म बूस्ट करते : आंब्याच्या कोयीची पावडर याशिवाय आणखी एका गोष्टीसाठी आपल्याला आरोग्यदायी ठरते. शरीरात मेटॅबॉलिज्म बूस्ट करण्याचं काम ही पावडर करते. आंब्याच्या कोयीची पावडर खाल्ल्याने तुम्ही कमी वेळेत जास्त कॅलरी बर्न करू शकता. वजन कमी करण्यासाठीही या पावडरमुळे मदत होते.
- कोलेस्ट्रॉलवर औषधी : कोलेस्ट्रॉलची समस्या असलेल्यांसाठीही आंब्याच्या कोयीचा फायदा होतो. आंब्याच्या कोयीची पावडर खाल्ल्याने कोलेस्ट्रॉलची समस्या कमी होण्यास भरपूर मदत होते. कोलेस्ट्रॉल पातळी कमी करण्यासाठी ही पावडर फायद्याची ठरते. कोयीची पावडर खाल्ल्यानं हृदविकाराचा त्रास असलेल्यांनाही फायदा होतो. हृदयविकाराचा धोका या पावडरच्या सेवनाने कमी होतो.
- रोग प्रतिकार शक्ती वाढवते : रोग प्रतिकार शक्ती कमी असलेल्यांसाठी आंब्याच्या कोयीची पावडर एखाद्या औषधापेक्षा कमी नाही. आंब्याच्या कोयीची पावडर रोग प्रतिकार शक्ती वाढवण्यासाठी मदत करते. आंब्याच्या कोयीच्या पावडरमध्ये हाय एंटीऑक्सिडेंट्स असतात. इम्युनिटी बूस्टरचं काम या पावडरमुळे होतं. एवढंच नाही तर इतरही अनेक आजारांचा धोका या पावडरच्या सेवनामुळे कमी होतो.
- पचनक्रिया सुधारते : आंब्याच्या कोयीपासून बनवलेल्या पावडरमध्ये फायबर मोठ्या प्रमाणावर असते. फायबरच्या सेवनामुळे पचनक्रिया सुधारण्यास खूप मदत होते. जर तुम्हाला बद्धकोष्टतेचा त्रास असल्यास ती समस्यासुद्धा कमी होण्यासाठी आंब्याच्या कोयीची पावडर उपयोगी ठरते. ही पावडर सेवन केल्यानं पोटातील गॅस, अपचन आणि एसिडीटीचा त्रासही कमी होण्यास मदत होते.

किडनी, आतड्यांची सफाई करते टरबूज

उन्हाळ्यात शरीर थंड ठेवण्यासाठी आणि पाण्याची कमतरता टाळण्यासाठी कलिंगड हे सर्वोत्तम फळ मानले जाते. कडाक्याच्या उन्हात शरीरातून निघून गेलेल्या पदार्थांची कमी पुन्हा भरून काढण्यासाठी हे गोड आणि पाण्याने समृद्ध फळ उत्तम पर्याय आहे. कलिंगडात ९० टक्क्यांपेक्षा जास्त पाणी असते आणि व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन ए, बी ६ आणि पोटॅशियम, मॅग्नेशियम, लोह, फॉस्फरस, फोलेट आणि कॅल्शियम यांसारख्या खनिजांचा हे चांगला स्रोत आहे. डिहायड्रेशन रोखण्याबरोबरच हे रसदार आणि स्वादिष्ट फळ वजन कमी करण्यास देखील मदत करू शकते. कलिंगड हे नैसर्गिक ॲंटिऑक्सिडंट्सचा उत्तम स्रोत आहे. विशेषतः हे लाइकोपीन, एस्कॉर्बिक ॲसिड आणि सिट्रुलीन सारख्या घटकांचे भांडार आहे. लाल रंगाचे हे फळ हृदयविकारापासून कर्करोगापर्यंत अनेक जुनाट आजारांपासून संरक्षण करण्यासाठी उपयुक्त आहे.



कलिंगडाचे आयुर्वेदिक गुणधर्म व लाभ

- रस (चव) - गोड
- वीर्य (शक्ती) - थंड
- गुरु - पचनास उपयुक्त
- संथारपनो - सर्व ऊतींचे (धातू) पोषण करते
- बल्या - शक्तीत सुधारणा
- वीर्य वाढवणे - पौरुषत्व वाढवते
- पुष्टी विवर्धन - पोषण वाढवते
- दोषांवर प्रभाव- पित्त दोष संतुलित करते

कोणत्या रोगांवर लाभदायक?

- अति तहान लागण्यापासून आराम मिळतो
- डिहायड्रेशनपासून बचाव होतो
- थकवा दूर करते
- शरीरातील जळजळ कमी करते
- लघवीतील वेदनांपासून आराम मिळतो
- मूत्राशयातील संक्रमणापासून मुक्ती मिळते
- सूज आणि जळजळपासून आराम मिळतो

कलिंगड खाण्याचे नियम

कलिंगड खाण्याचा उत्तम मार्ग म्हणजे ते कमी प्रमाणात खावे. जेवणासोबत कलिंगड खाऊ नये. सकाळी १० ते १२ च्या दरम्यान कलिंगड खाणं कधीही उत्तम. याशिवाय संध्याकाळी ५ वाजण्यापूर्वी देखील तुम्ही याचे सेवन करू शकता. रात्री किंवा जेवणासोबत चुकूनही ते खाऊ नये. मधुमेह आणि पचनाच्या समस्या असलेल्या सर्व लोकांनी हे खाणे टाळले पाहिजे.

बियाही लाभदायक

कलिंगडाच्या बिया गुणधर्माने थंड, मूत्रवर्धक आणि पोषक असतात. या बियांच्या तेलामध्ये लिनोलिक ॲसिड, ओलिक ॲसिड, पामिटिक आणि स्टिअरिक ॲसिडचे ग्लिसराइड्स असतात. ते स्नॅक्स म्हणून वापरले जाऊ शकतात. या बिया वाळवल्या जातात, भाजल्या जातात किंवा पीठात वाटल्या जातात.

रिझर्व्ह बँक भारताच्या आर्थिक स्थैर्याचा आधारस्तंभ –राष्ट्रपती

मुंबई (प्रतिनिधी) – भारत २०४७ मध्ये 'विकसित भारत' होण्याच्या दिशेने पुढे जात असताना, अर्थव्यवस्थेतील नव्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी नाविन्यपूर्ण आणि समावेशक वित्तीय प्रणाली आवश्यक आहे. रिझर्व्ह बँक भारताच्या आर्थिक स्थैर्याचा आधारस्तंभ राहणार आहे. भारताला डिजिटल व्यवहारांमध्ये जागतिक नेतृत्व मिळवून देण्यात रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचा मोठा वाटा आहे. मजबूत बँकिंग प्रणाली, वित्तीय नवउपक्रम आणि ग्राहकांचा विश्वास कायम राखण्याच्या दृष्टीने याची भूमिका अत्यंत महत्त्वाची असेल असे प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केले.

एनसीपीए नरिमन पॉईंट येथे आयोजित रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या ९० व्या वर्धापन दिनानिमित्त कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा उपस्थित होते.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू म्हणाल्या की, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या ९०व्या वर्धापन दिनाचा उत्सव आज साजरा करत आहोत. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया या प्रतिष्ठित संस्थेच्या महत्त्वपूर्ण टप्प्यावर ही देशातील सर्वात महत्त्वाच्या संस्थांपैकी एक आहे. देशाची केंद्रीय बँक म्हणून रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया भारताच्या अद्वितीय विकास प्रवासाच्या केंद्रस्थानी आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील खडतर स्थितीपासून ते आजच्या जागतिक महासत्तेपर्यंतच्या प्रवासात आरबीआय हा महत्त्वाचा आधारस्तंभ राहिला आहे. १९३५ मध्ये स्थापन झालेली ही संस्था नेहमीच देशाच्या विकासाच्या प्रवासापेक्षा एक पाऊल पुढे राहिली असून या प्रवासात देशाचे नेतृत्वही केले असल्याचे राष्ट्रपती श्रीमती मुर्मू म्हणाल्या.

आरबीआय केवळ केंद्रीय बँक नसून वित्तीय समावेशन व संस्थात्मक उभारणीमध्येही महत्त्वाची भूमिका बजावत आहे. संस्थात्मक बांधणीच्या दृष्टिकोनातून आरबीआय ने नाबार्ड, आयडीबीआय, सिडबी आणि नॅशनल हाऊसिंग बँक यांसारख्या महत्त्वपूर्ण वित्तीय संस्था स्थापन केल्या आहेत, ज्या शेती, लघु व्यवसाय आणि गृहनिर्माण क्षेत्रासाठी महत्त्वाचा पाठिंबा देतात. 'लीड बँक योजना'सारख्या उपक्रमांमुळे बँकिंग सेवा ग्रामीण भागांपर्यंत पोहोचवण्यात मदत झाली आहे.

भारत निवडणूक आयोगाची राजकीय पक्षांसोबत संवाद मोहीम

मुंबई (प्रतिनिधी) – भारतीय निवडणूक आयोगाने देशभरात मतदार नोंदणी अधिकारी, जिल्हा निवडणूक अधिकारी आणि मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या स्तरावर राजकीय पक्षांसोबत संवाद साधण्याची मोठी मोहीम राबवली. आतापर्यंत एकूण २५ दिवसांच्या कालावधीत आणि ३१ मार्च २०२५ पर्यंत, देशभरामध्ये एकूण ४,७१९ बैठका घेण्यात आल्या आहेत. यामध्ये मुख्य निवडणूक अधिकारी यांनी ४० बैठका, जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी ८०० आणि मतदार नोंदणी अधिकारी यांनी ३,८७९ बैठका घेतल्या, ज्यामध्ये देशभरातील २८ हजारांहून अधिक राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी सहभाग घेतला.

या बैठका ४-५ मार्च २०२५ रोजी आयआयआयडीईएम खखखअएच्, नवी दिल्ली येथे झालेल्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या परिषदेच्या दरम्यान, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि निवडणूक आयुक्त डॉ.सुखबीर सिंह संधू व डॉ.विवेक जोशी यांनी दिलेल्या निर्देशांनुसार आयोजित करण्यात आल्या.

लोकप्रतिनिधित्व कायदा १९५० व १९५१, मतदार नोंदणी नियम १९६०, निवडणूक संचलन नियम १९६१ आणि मॅन्युअल्स, निवडणूक आयोगाने वेळोवेळी जारी केलेल्या मार्गदर्शक तत्त्वे व निर्देश यांच्यानुसार सबंधित अधिकाऱ्यांकडून प्रलंबित प्रकरणांचे निराकरण करणे हा या संवाद बैठकींचा उद्देश होता. सर्व राज्ये व केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांकडून कृती अहवाल मागवण्यात आला असून, कायदेशीर चौकटीत न सोडवता आलेले कोणतेही मुद्दे आयोगाच्या स्तरावर घेतले जातील.

विधानसभा मतदारसंघ, जिल्हे आणि राज्य/केंद्रशासित प्रदेश स्तरावरील संवाद बैठकीत राजकीय पक्षांचा सकारात्मक सहभाग दिसून आला, असे भारत निवडणूक आयोगाने एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

'अभिजात मराठी'साठी लवकरच समिती गठित करणार –ना. उदय सामंत

मुंबई (प्रतिनिधी) – मराठी भाषेला अभिजात मराठी भाषेचा दर्जा प्राप्त झाला असून आता भाषेच्या संशोधन आणि विकासासाठी तसेच भाषेच्या उन्नतीसाठी काम करण्यात येत आहे. यासाठी लवकरच एक समिती गठित करण्यात येईल, असे मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी सांगितले.

मुखमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पदभार स्वीकारल्यानंतर प्रत्येक विभागास १०० दिवसांमध्ये करावयाच्या कामांची उद्दिष्टे दिली, त्या अनुषंगाने मराठी भाषा मंत्री सामंत यांच्या अध्यकतेखाली मंत्रालयात आढावा बैठक झाली. बैठकीस मराठी भाषा विभागाचे सहसचिव दादासाहेब भोसले तसेच विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मराठी भाषा मंत्री सामंत म्हणाले की, मराठी पुस्तकांना पुरस्कार देण्यात येतो. वाचक हा पुस्तक खरेदी करताना प्रथम पुस्तकाचे मुखपृष्ठ पाहून पुस्तक घेतो. त्यामुळे मराठी पुस्तकांच्या उत्तम मुखपृष्ठासाठी पुरस्कार देण्याबाबत प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

श्री.सामंत म्हणाले की, मराठी भाषा विभागाच्या सर्व क्षेत्रीय कार्यालयांचे नूतनीकरण करण्यात येत असून प्रत्येक जिल्ह्यात मराठी भाषा भवन उभारण्याचे काम सुरू आहे. सीमा भागात असलेल्या गावामध्ये मराठी भाषेच्या प्रसारासाठी निधीची तरतूद करण्यात येईल, असे मराठी भाषा मंत्री सामंत यांनी यावेळी सांगितले.

जिनिंगमधील दोन कोटी ३२ लाखांचा कापूस खाक

छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) – फुलंब्री तालुक्यातील खामगाव फाटा येथील राजेंद्र फायबर कॉटन जिनिंगला सोमवारी रात्री ९ च्या सुमारास अचानक आग लागली. या घटनेत २ हजार ८ ते ३ हजार क्विंटल कापूस ज्याची किंमत २ कोटी ३२ लाखांच्या आसपास असल्याची प्राथमिक माहिती आहे.

राहुल प्रमोद नहार हे वरील जिनिंगचे मालक असल्याची माहिती अग्निशमन विभागाकडून देण्यात आली. विभागाला ९.१० वाजता जिनिंगला आग लागल्याचा फोन आला. तातडीने सिडकोतील एन-९ मधील अग्निशमन विभागाचे वाहन अधिकारी हरिश्चंद्र पवार, रवी हरणे, रामेश्वर बमणे, नागेश जाधव व चालक विठ्ठल गावंडे खामगाव फाट्याच्या दिशेने रवाना झाले.

स्वस्तात सोने देण्याचे आमिष दाखवून एक कोटींची फसवणूक

मुंबई (प्रतिनिधी) – सीमा शुल्क विभागातर्फे करण्यात येणाऱ्या लिलावातील सोने स्वस्त दरात मिळवून देण्याचे आमिष दाखवून कुर्ल्यातील व्यावसायिची कोट्यावधी रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी व्यावसायिकाच्या तक्रारीनंतर वाकोला पोलिसांनी पाच जणांविरोधात फसवणूक व फौजदारी विश्वासघात केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला.

तक्रारदार इम्तियाज शेख (४४) यांचा मटण वितरणाचा व्यवसाय आहे. तक्रारीनुसार, सप्टेंबर २०२३ मध्ये त्यांची ओळख दोन आरोपींसोबत झाली.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते महाबळेश्वर पर्यटन महोत्सवाच्या बोधचिन्हाचे अनावरण

मुंबई (प्रतिनिधी) – राज्य शासनाच्या पर्यटन विभागांतर्गत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ व स्थानिक जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यातील पर्यटनाला चालना देण्यासाठी २ ते ४ मे २०२५ या कालावधीत तीन दिवस महाबळेश्वर पर्यटन महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहे. सह्याद्री अतिथीगृह येथे महाबळेश्वर पर्यटन महोत्सवाच्या बोधचिन्हाचे अनावरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक, पर्यटन विभागाचे प्रधान सचिव अतुल पाटणे, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक मनोज सूर्यवंशी, पर्यटन संचालक डॉ. बी. एन. पाटील, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे महाव्यवस्थापक चंद्रशेखर जयस्वाल, एमटीडीसीचे मुख्य लेखा वित्त अधिकारी जितेंद्र सोनवणे उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे २ मे २०२५ रोजी उद्घाटन होणार असून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, पर्यटन मंत्री शंभूराजे देसाई, पर्यटन राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम होणार आहे. पर्यटन विभाग व स्थानिक जिल्हा प्रशासनाच्या सहकार्याने आयोजित करण्यात येणाऱ्या तीन दिवसीय महोत्सवात प्रेक्षणीय स्थळे, स्थानिक कला संस्कृती, खाद्यसंस्कृतीची ओळख पर्यटकांना व्हावी आणि या माध्यमातून पर्यटन वृद्धी व्हावी हा या महोत्सवाचा मुख्य उद्देश आहे.

या महोत्सवात स्थानिक लोक संस्कृतीचा समावेश असलेले कार्यक्रम तसेच नामांकित कलाकारांचा सहभाग असलेल्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे स्ट्रॉबेरी व कृषी पर्यटन महोत्सवाचे आयोजन, महाबळेश्वर परिसरातील उदा. पाचगणी, कास पठार, कोयनानगर, तापोळा, गड-किल्ले दर्शन व इतर पर्यटन स्थळ, दर्शन सहलीचे आयोजन, पर्यटकांसाठी विविध श्रेणीच्या तंबू निवास उभारणी करण्यात येणार आहे.

मोदी सरकारच्या काळात आरोग्य क्षेत्रात सुधारणा –गृहमंत्री शहा

नवी दिल्ली (प्रतिनिधी) – गेल्या दशकभरात देशाच्या आरोग्य क्षेत्रातील पायाभूत सुविधांमध्ये मोदी सरकारने मोठ्या प्रमाणात सुधारणा घडवून आणल्या आहेत, असे प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सोमवारी केले. प्राथमिक ते उच्च माध्यमिक स्तरापर्यंत या सुधारणा घडल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

हिसारमधील अग्रोहा येथील महाराजा अग्रसेन वैद्याकीय महाविद्यालयाच्या आवारातील महाराजा अग्रसेन यांच्या पुतळ्याचे अनावरण शहा यांच्या हस्ते झाले. या वेळी नव्याने बांधलेल्या 'आयसीयू' कक्षाचे उद्घाटन, पदव्युत्तर वसतिगृहाची पायाभरणी शहांच्या हस्ते करण्यात आली.

शहा यांनी नरेंद्र मोदी सरकारने विविध क्षेत्रांत राबवलेल्या विविध उपक्रमांवर प्रकाश टाकला. मोदी सरकारच्या कार्यकाळात दारिद्र्यरेषेखालील २५ कोटी नागरिकांच्या जीवनात सुधारणा घडवून आणल्या. तसेच गरिबांसाठी चार कोटी घरांची उभारणी केली, ज्यामुळे २० कोटी लोकांना निवारा मिळाल्याचे शहा यांनी नमूद केले.

पंतप्रधान गरीब कल्याण अन्न योजनेअंतर्गत केंद्र सरकारने ८१ कोटींहून अधिक लाभार्थ्यांना मोफत अन्नधान्य आणि स्वच्छ भारत अभियानांतर्गत प्रत्येक घरात शौचालयाची तरतूद केल्याचे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सांगितले.

नायब तसीलदारांनी निर्गमित केलेले ३२२० जन्म व मृत्यू प्रमाणपत्र रद्द

वाशिम (प्रतिनिधी) – वाशीम जिल्ह्यात नायब तहसीलदारांनी निर्गमित केलेले तीन हजार २२० जन्म व मृत्यू प्रमाणपत्र रद्द करण्याचा आदेश जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. यांनी दिला. रद्द केलेल्या प्रमाणपत्र प्रकरणी फेरचौकशी करून निर्णय घेतला जाणार आहे. जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ (सुधारणा अधिनियम २०२३) मधील कलम १३ (३) अन्वये ज्या कोणत्याही जन्माची किंवा मृत्यूची तो घडल्यानंतर एक वर्षाच्या आत नोंदणी करण्यात आली नसेल त्याची नोंदणी खातरजमा करून जिल्हा दंडाधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी किंवा प्राधिकृत कार्यकारी दंडाधिकारी यांनी दिलेल्या आदेशावरुन करण्याची तरतूद आहे.

वाशीम जिल्ह्यात कार्यकारी दंडाधिकाऱ्यांना अधिकार प्रदान करण्यात आले होते. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आदेशान्वये नायब तहसीलदार महसूल व निवासी नायब तहसीलदार यांना अधिकार दिले होते. या अधिकारानुसार वाशीम जिल्ह्यात तीन हजार ०६३ जन्म, तर १५७ मृत्यू असे एकूण तीन हजार २२० प्रमाणपत्र नायब तहसीलदारांनी निर्गमित केले होते. यामध्ये वाशीम तालुक्यात ३७८, मालेगाव ४१८, रिसोड ५३४, मंगरुळपीर ९६९, कारंजा ५२२ व मानोरा तालुक्यातील ३९९ प्रमाणपत्रांचा समावेश आहे.

राज्य शासनाच्या १७ मार्चच्या पत्रानुसार अकोला जिल्ह्यासह राज्यात ११ ऑगस्ट २०२३ पासून स्थगित आदेशापर्यंत निर्गमित झालेल्या जन्म व मृत्यू प्रमाणपत्रांपैकी तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी या पदापेक्षा कमी दर्जाच्या अधिकाऱ्यांनी निर्गमित केलेले प्रमाणपत्र रद्द करण्यात येत आले.

दिवसाढवळ्या तरुणाचा गळा चिरून खून

लातूर (प्रतिनिधी) – तालुक्यातील मुरुड शेजारील करकट्टा या गावी एका ४० वर्षीय तरुणाचा भर दिवसा गळा चिरून खून करण्यात आला आहे. रविवारी दुपारी ही घटना घडली असून याप्रकरणी मुरुड पोलीस ठाण्यात पाच जणाविरुद्ध आरोपीच्या पत्नीने तक्रार दिल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार वैशाली शरद इंगळे वय ३९ यांनी मुरुड पोलिसात दिलेल्या तक्रारीत असे म्हटले आहे की, अनैतिक संबंधाच्या संशयावरून पाच आरोपीने आपले पती शरद प्रल्हाद इंगळे यांचा रविवारी करकट्टा येथील खडी केंद्रावर ऊस तोडण्याच्या कोयत्याने हल्ला करून खून केला आहे, या आरोपींना तात्काळ अटक करावी, अशी मागणी केली आहे. करकट्टा येथील मुकादम शरद प्रल्हाद इंगळे हे गावालगत असलेल्या खडी केंद्रावर गुढीपाडव्याच्या दिवशीही कामाला गेले होते. या ठिकाणी जाऊन शरद इंगळे यांच्यावर कोयत्याने आरोपीने हल्ला केला व त्यांचा गळा चिरून आरोपी पसार झाले आहेत.

टी. सी. हरवली

माझी दुर्गा अशोक देशमाने या नावाची इयत्ता १० वी पासची टी. सी. तामसा ते - हदगाव बस दरम्यान प्रवासात हरवली आहे. ज्यांना सापडली असेल, त्यांनी खालील पत्यावर संपर्क करावा.

संपर्क पत्ता–
दुर्गा अशोक देशमाने
रा.मु.पो.तामसा ता.हदगाव जि.नांदेड मो.९७६५९०६५७१

Change In Name

My Old Name is Swaroop Subhash Suryawanshi which now I am changing as New Name VSwaroop Subhashrao Suryawanshi Henceforth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same AD- 1-11-448, Dyneshwar Nagar, Chatrapati Chowk, Nanded, 431605.

एकट्या राहणाऱ्या ज्येष्ठाची २४ लाखांची फसवणूक

रत्नागिरी (प्रतिनिधी) – एकटे राहणाऱ्या ज्येष्ठाची सोसायटीतील रखवालदाराने २४ लाख ४८ हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला. हडपसर पोलिसांनी याप्रकरणाचा तपास करुन रखवालदारासह साथीदाराला अटक केली. इफ्तेखार रहीमखान पठाण (वय ३१, रा. गोवंडी, मुंबई), मोहम्मद हनीफ मोहम्मद अफसर (वय ५२, रा. म्हसोबा मंदिराजवळ, काळेपडळ, हडपसर, मूळ रा. पातूर, जि. अकोला) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत.

याबाबत एका महिलेने हडपसर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार महिला बंगळुरूत नोकरीनिमित्त वास्तव्यास आहेत. त्यांचे वडील हडपसर भागातील एका सोसायटीत राहायला आहेत. एकट्या राहणाऱ्या ज्येष्ठ नागरिकाशी सोसायटीतील रखवालदार पठाण याने ओळख वाढवून त्यांच्या बँक खात्याची माहिती घेतली. बँक खात्याचा माहिती घेतल्यानंतर त्याने परस्पर खात्यातून २४ लाख ४८ हजार रुपयांची रक्कम ऑनलाइन पद्धतीने काढून घेतली.

Change In Name

My (old name) is GIRIDHAR BOKAN which now I am, changing as (new name) GIRDHARI BALAJIRAO BOKAN Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.Sign by-GIRDHARI BALAJIRAO BOKAN Shri Hari Kunj, Dilipsingh Colony, VazirabadNanded-431601 M. No. 9518791147

जाहीर प्रगटन

सर्व जनतेस व संबधीतास या जाहीर प्रगटनात येते की ज्ञानोबा भक्तरे यांनी मला दिलेल्या माहीती व अधिकार व त्यांच्यावतीने मी खालील प्रमाणे प्रगटन देत आहे.

हे की, माझ्या पक्षकाराचे आजोबा ब्रम्हाजी पि. सोनाली भुक्तरे हे मौजे धन ता. मुदखेड जि. नांदेड येथील स.न. ३४ गट क्र. ३१ मधील ६ हे. ८४ आर जमीनीवर संरक्षीत कुळ म्हणून काबीज होते. त्यांच्या मृत्यु नंतर त्यांचे वारस म्हणजेच प्रगटन देणार ब्रम्हाजी पि. ज्ञानोबा भुक्तरे व त्यांचे बंधु सदरील जमीनीवर कुळाचे वारस म्हणून आजही काबीज आहेत.

२. हे की, असे असतांना मुळ जमीन मालकाचा वारस अब्दुल अजिज यांनी दिनांक २१/१२/२०२१ रोजी उपरोक्त जमीनी पैकी हे ७४ आर शेतजमीन खरेदीखत क्र. २२/२०२२ व्दारे श्री हरमिंदरसिंघ साहेबसिंघ पटवारी आणि शेख अहमद पि. शेख बनेमिया यांना विनाताया संयुक्तपणे विक्री केली आहे. त्यामुळे माझ्या पक्षकारांनी स दिवाणी न्यायालय, नांदेड येथे विशेष दिवाणी दावा क्र. १३६/२०२२ ब्रम्हाजी विरुध्द अब्दुल अजिज व इतर हा दावा खरेदीखत रद्द करण्यात यावे, मालकी जाहीर करावी व वादजमीन हस्तांतरीत करु नये म्हणून दावा दाखल केला आहे. तसेच दिवाणी दावा क्र. १६६/२०२३ ब्रम्हाजी व. अब्दुल अजिज व इतरा विरुध्द कायमचा मनाई हुकुमासाठी दावा दाखल केला असुन उपरोक्त दोन्ही दावे न्याय प्रविष्ठ आहेत.

हे की, असे असतांना श्रीहरमिंदसिंघ साहेबसिंघ पटवारी व शेख अहमद पि. शेख बनेमिया यांनी उपरोक्त दोन्ही दावे न्याय प्रविष्ट असतांना व त्यांचा प्रत्यक्ष जमीनीवर ताबा नसतांना मौजे धनज ता. मुदखेड जि. नांदेड येथील स.न. ३४ गट क्र. ३१ मधील ६ हे ८४ आर जमीनी पैकी हे ७४ आर शेतजमीन बिनाताबा बेकायदेशिर पणे प्रेमज्योत सिंघ पि. गुरुबच्चनसिंघ, जयदीप दत्तात्रय शिंदे आणि रामा विठ्ठलराव सावंत यांना संयुक्तरित्या खरेदीखत क्र. १५७२/२०२४ दिनांक २२/०१/२०२४ रोजी उपरोक्त दोन्ही वाद न्यायालयात न्यायप्रविष्ठ असतांना विक्री केले आहे.

तरी सर्व जनतेस या जाहीर प्रगटना व्दारे कळविण्यात येते की, प्रेमज्योंतसिंघ गुरुबच्चनसिंघ, जयदिप दत्तात्रय शिंदे आणि रामा विठ्ठलराव सावंत हे गट क्र. ३१ मधील हे ७४ आर जमीन पुन्हा विक्री करण्याचा किंवा कोणत्याही प्रकारे हस्तांतरीत करण्याचा प्रयत्न करीत आहेत. तरी उपरोक्त हे ७४ आर जमीन कोणीही खरेदी करु नये किंवा कोणत्याही प्रकारे हस्तांतरीत करुन घेऊ नये, कोणहीही उपरोक्त हे ७४ आर शेतजमीन कोणत्याही प्रकारे हस्तांतरीत करुन घेतल्यास हस्तांतरीत करुन घेणार त्यास जबाबदार राहातील, माझे पक्षकार त्यास कोणत्याही प्रकारे जबाबदार राहाणार नाहीत. करीता हे जाहीर प्रगटन.

ॲड.
के.के.कापुरे
जिल्हा व सत्र न्यायालय नांदेड मो.९०११५९२३९३

देगलूर नगरपरिषद देगलूर जि.नांदेड

फोन नंबर (०२४६२)२५७६२४ फॅक्स नंबर (०२४६२) २५५७७७
E-Mail.codegloor@gmail.com
जा.क्र.न.पा.पाणी पुरवठा विभाग/२०२५ दिनांक //२०२५

जाहीर निविदा सुचना

मुख्याधिकारी नगरपरिषद देगलूर जि.नांदेड यांचेकडून नगरपरिषद निधीतुन वर्षे २०२५-२६ या सालासाठी नगरपरिषद पाणी पुरवठा विभागासाठी १.न.पा. हद्दीतील हतपंप आणि १ एचपी ते ७.५ एचपी सबमर्सीबलपंप मोटार व स्टार्ट दुरूस्थी करणे २.स्टेशनरी साहित्य पुरवठा करणे ३.छापील साहित्य पुरवठा करणे ४.पिण्याचे पाणी (मिनरल वॉटर २० लिटर पाणी कॅन पुरवठा करणे) ५.नगरपरिषद आयोजि कार्यक्रमाचे व्हिडीओ शुटींग करणे व फोटो काढणे ६.नगरपरिषद आयोजित कार्यक्रमासाठी टेंट,खुर्चा,सतरंजी स्पीकर सेट इत्यादी भाड्याने पुरवठा करणे कामासाठी नोंदणीकृत योग्य त्या वर्गातील कंत्राटदाराकडून सिलबंद लिफाफ्यात कार्यालयीन वेळेत दिनांक २/४/२०२५ ते ११/४/२०२५ पर्यंत निविदा मागविण्यात येत आहेत.सविस्तर जाहीरात अटी व शर्ती सह माहिती नगरपरिषद कार्यालयात उपलब्ध आहे.

निविदेच्या अटी शर्तीमध्ये बदल करणे, प्राप्त निविदा पैकी १ किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार मुख्याधिकारी नगरपरिषद देगलूर यांनी राखून ठेवला आहे.

मुख्याधिकारी
नगरपरिषद, देगलूर

कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रॅडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

जाहीर प्रगटन

जिल्हा न्यायाधीश-१,बिलोली यांच्या न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ९/२०२५
कविता पाटील वि.निरंक

ज्याअर्थी अर्जदार कविता भ्र.व्यंकटराव पाटील वय ४१ वर्षे धंदा घरकाम रा.आलूर ता.देगलूर जि.नांदेड व इतर १ यांनी या या न्यायालयात हिंदु अज्ञान पालकत्व कायदा कलक ८ अन्वये अर्ज सादर केला आहे.सदरील अर्जामध्ये अर्जदाराने वैशाल पि.त्रिब्यंकराव पाटील हिचा नावे असलेलली जमिन मौजे आलूर ता.देगलूर जि.नांदेड येथील गट क्र.१२९ क्षे.०० हेक्टर ४५ आर व पोट खराब १ आर अशी एकूण ४६ आर जमिन विक्री करण्याची परवानगी मागितली आहे. त्या अनुषंगाने अर्जदार यांचे ईतर कोणी नातलग अथवा हितचिंतक यांचा कुणाचा जर काही आक्षेप असेल तर त्यांनी मा. कोर्टात दि. ८ /५/ २०२५ रोजी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन कार्यालयीन दिवशी व वेळेत स्वतः किंवा वकीलामार्फत हजर होउन आपले म्हणणे सादर करावे, याद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त तारखेपर्यंत या न्यायालयात उपस्थितीत राहण्यास कसूर केल्यास अर्जात पुढील आदेश पारीत केला जाईल.आज दिनांक २९/३/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरून

(एन.आर.संगवई) **अधिक्षक**
क. लिपीक **जिल्हा न्यायालय बिलोली**

स्थलांतर
सिटी मॅक्स डिजिटल कलर
मो.7058766021,9422185282
गड्डम मार्केट,पहिला मजला,
शिवाजी नगर,नांदेड

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308

महापालिकेत आपत्ती व्यवस्थापन संदर्भात मान्सून पूर्व आढावा बैठक

विशेष खबदारी घेण्याचे आयुक्तांचे क्षेत्रिय अधिकाऱ्यांना निर्देश

नांदेड (प्रतिनिधी) – आपत्ती व्यवस्थापना संदर्भात मंगळवारी (दि. १ एप्रिल) आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी महापालिकेत मान्सून पूर्व कामांचा आढावा घेतला. मान्सून काळात शहरात उद्भवणाऱ्या संभाव्य संकटाचा सामना करण्यासाठी क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी विशेष खबरदारी घ्यावी, असे निर्देश देण्यात आले.

शहरातील विविध भागात अर्धवट कामे झाल्यामुळे पावसाळ्यात सखल भागात पाणी साचून शहरवासियांना गैरसोयींचा सामना करावा लागतो. या दृष्टिकोनातून प्रलंबित कामे पावसाळ्यापूर्वी तातडीने पुर्ण करण्याचे निर्देश आयुक्त डॉ. डोईफोडे यांनी दिले.

नांदेड शहरातून वाहणारी गोदावरी नदीची इशारा आणि धोक्याची पातळी ३५४ मीटर आहे. पुरामुळे बाधीत होणाऱ्या घरांची संख्या २ हजार ७७२ आहे. या सर्व रहिवाशांना वेळीच नोटीस देण्याची सूचनाही आयुक्तांनी क्षेत्रिय अधिकाऱ्यांना देण्यात आली.

तसेच अतिवृष्टीमुळे अथवा पूरपरिस्थितीमुळे शहरातील विविध भाग प्रभावित होतात. त्यामध्ये प्रामुख्याने झोन क्रं.२ अंतर्गत बाबानगर, हिंगोली गेट, दत्तनगर, शाहुनगर, गोविंदनगर, सादतनगर, तानाजीनगर, मगणपुरा, खोब्रागडेनगर. झोन क्रं.३ अंतर्गत श्रवस्तीनगर, भिम संदेश कॉलनी. झोन क्रं.४ अंतर्गत खकडपुरा, दुल्हेशाह रहमाननगर, बंदाघाट, देगावचाळ, भिमघाट, गोवर्धनघाट, गाडीपुरा, शनिमंदिर, जुना मोढा, शहीदपुरा. त्याचप्रमाणे जुन्या नांदेड भागातील झोन क्रं.५ अंतर्गत मोमीनपुरा, सिध्दार्थनगर, नावघाट, किल्ला परिसर, कालापुल, करबला, गणीमपुरा, चौफाळा, विणकर कॉलनी, ब्रम्हपुरी, गंगानगर. झोन क्रं.६ सिडको अंतर्गत जुना कौठा, साईबाबा परिसर, कौठा, वसरणी इत्यादी भागांमध्ये विशेष खबदारीच्या उपाययोजना करण्याचे आदेश यावेळी आयुक्तांनी सर्व क्षेत्रिय अधिकाऱ्यांना दिले.

तसेच शहरात अतिवृष्टीच्या काळात रोगाचा प्रादुर्भाव होणार नाही यासाठी मलेरिया विभागा मार्फत वेळोवेळी फवारणी, पावसाळ्यात नागरीकांना स्वच्छ पाणी पुरवठा, पावसाळ्यात वादळी वाऱ्यामुळे होडींग्स विविध प्रकारचे सुचना फलक पडुन दुर्घटना घडणार नाही, त्याच प्रमाणे मनपा हद्दीतील जुन्या मोडकळीस आलेल्या इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट करुन नोटीसा बजावण्याच्या सुचना यावेळी संबंधीत अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

मान्सून पूर्व नियोजनातील सुक्ष्म पध्दतीने छोटे-मोठे नाले, यंत्र तसेच मनुष्यबळाव्दारे नाले सफाईचे काम दि.३१ मे २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचेही निर्देश आयुक्तांनी दिले आहेत.

या बैठकीस अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम यांच्यासह उपआयुक्त सुप्रिया टवलारे, अजितपालसिंघ संधु, शहर अभियंता सुमंत पाटील, सहा संचालक नगरचनाकार पवन आलुलकर, कार्यकारी अभियंता विश्वनाथ स्वामी, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. सुरेशसिंह बिसेन, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ. मिर्झा बेग, सहाय्यक आयुक्त (स्वच्छता) मो. गुलाम सादेक, अग्निशमन अधिकारी के. जी. दासरे, उपअभियंता सतीश ढवळे, प्रकाश कांबळे, दिलीप टाकळीकर, क्षेत्रिय अधिकारी रमेश चवरे, रावण सोनसळे, गौतम कवडे, राजेश जाधव, निलावती डावरे यांची उपस्थिती होती.

जिजाऊ रथयात्रा ५ एप्रिल रोजी नांदेडमध्ये दाखल होणार

नांदेड (प्रतिनिधी) – छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वेरूळ गढी येथून प्रारंभ झालेली जिजाऊ रथयात्रा मराठा जोडो अभियान दि.५ एप्रिल रोजी नांदेड जिल्ह्यात दाखल होणार आहे. सर्व ठिकाणी या यात्रेचे समाज बांधवांच्या वतीने जंगी स्वागत करण्यात येणार आहे.

ही रथयात्रा नांदेड जिल्ह्यात शनिवार पाच एप्रिल रोजी दुपारी वसमत मार्गे आलेगाव, निळा, तळणी मार्गे नांदेड शहरात येईल. सहा एप्रिल रोजी नांदेड शहरातुन गुरूद्वारा, सिडको, लोहा, कंधार, मुखेड व नरसी फाटा येथे मुक्काम असणार आहे. सात एप्रिल रोजी नरसी फाटा येथुन निघून नायगाव, उमरी, भोकर, हदगाव मार्गे उमरखेडकडे मार्गस्थ होणार आहे.

महाराष्ट्रभर फिरणाऱ्या या जिजाऊ रथयात्रेतून सर्वंच चळवळींना बळ व ऊर्जा मिळेल. सदरील रथयात्रेनिमित्त यशवंतराव चव्हाण विद्यार्थी वसतिगृह येथे बैठक होणार आहे. या रथयात्रेत समाज बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे

यावेळी मराठा सेवा संघाचे प्रदेश सहसचिव प्राचार्य डॉ. पंजाबराव चव्हाण, इंजि.शे.रा पाटील, इंजि.व्ही. टी.शिंदे, जिल्हाध्यक्ष पंडीत कदम, जिल्हाध्यक्ष सतीश जाधव मुख्याध्यापक शिवाजी पाटील, जिजाऊ ब्रिगेड जिल्हाध्यक्षा सुनेत्रा वडजकर, अरूणा पाटील, शिवाजी पाटील बामणीकर, भास्कर थेटे, संजय हंबर्डे, प्रल्हादराव दुरपडे, प्रल्हादराव कऱ्हाळे, हौसाजीराव गाढे, संभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्ष सुभाष कोल्हे, नानाराव कल्याणकर, शिवमती कौशल्ये, सुनिता शिंदे, धनंजय पाटील, दत्ता कदम, पंडीतराव कदम, बालाजीराव वाघमारे, ज्ञानेश्वर शिंदे, केरबाजी शिंदे, अशोकराव खुडे, भास्कर थेटे, बाबाराव लोंढे यांच्या समाजबांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

पनवेल एक्स्प्रेस आणि पुणे एक्स्प्रेसमध्ये दोन डब्यांची वाढ

नांदेड (प्रतिनिधी)– उन्हाळ्यात होणारी प्रवाशांची गर्दी पाहता नांदेड-पनवेल-नांदेड एक्सप्रेस आणि नांदेड-पुणे-नांदेड एक्स्प्रेस या दोन गाड्यांमध्ये दोन अतिरिक्त डब्यांची वाढ करण्यात आली आहे.

गाडी क्रं.१७६१४ / १७६१३ नांदेड -पनवेल-नांदेड एक्स्प्रेस आणि गाडी क्रं. १७६३० / १७६२९ नांदेड -पुणे - नांदेड एक्स्प्रेस मध्ये एक तृतीय श्रेणी वातानुकुलीत डब्बा आणि एक द्वितीय श्रेणी शयन यान (स्लीपर क्लास) डब्बा असे दोन डब्बे जोडण्यात आले आहेत. पनवेल-नांदेड-पनवेल गाडी दि. १ एप्रिल ते ३० एप्रिल पर्यंत आणि पनवेल येथून सुटणाऱ्या गाडीत दिनांक ०२ एप्रिल ते ०१ मे पर्यंत वाढविण्यात आले आहेत.

नांदेड -पुणे - नांदेड एक्स्प्रेसमध्ये ३ एप्रिल ते ०२ मे पर्यंत आणि पुणे येथून सुटणाऱ्या गाडीत दिनांक ०४ एप्रिल ते ०३ मे पर्यंत वाढविण्यात आले आहेत. या दोन्ही गाड्या आता १७ डब्ब्यांच्या झाल्या आहेत.

आर्थिक वर्षाच्या पहिल्याच दिवसाची सुरुवात सामाजिक कामापासून -आयुक्त डॉ.डोईफोडे

नवीन नांदेड (प्रतिनिधी)– आर्थिक वर्षाच्या पहिल्याच दिवसाची सुरुवात सामाजिक कामांनी करण्यात आली, असे प्रतिपादन मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी केले. वसरणी येथील निवासी अंध विद्यालयात भारतीय स्टेट बँक नांदेड शाखा कौठाच्या सौजन्याने शाळेत शैक्षणिक भौतिक कार्यालयीन साहित्य भेट दिले. यानिमित्त मंगळवारी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे होते. प्रबंधक प्रिया कुमार सारीगला, प्रमुख पाहुणे संत्यंद्र आवुलर, संस्थापक व्हि.एस.गुटे, पकाला कालिदासु, रजत कुमार, प्रदिप शहारे, श्रध्दा मोहळ, मनपाचे वित्त लेखाधिकारी जनार्दन पक्कान्ने, संचालक नागेश गुट्टे, यांच्या सह मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

मुख्याध्यापक बाबुराव ईबतवार यांनी प्रास्ताविक व सुत्रसंचालन केले. यावेळी भारतीय स्टेट बँक प्रबंधक प्रिया कुमार सारीगला यांनी शाळेतील विद्यार्थी यांच्याशी सुसंवाद साधला. संगीत शिक्षक पंकज शिरभाते व विद्यार्थी यांनी स्वागत देशभक्ती गीत, भुपाळी, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पोवाडा, काव्य वाचन व वेगवेगळ्या वाद्य वाजवून उपस्थितांची मने जिंकली.

बँकेच्या वतीने संगणक, सौर ऊर्जा प्रकल्प, तीन चाकी ई-रिक्षा, साहित्य, आलमारी असे ८ लाख सतरा हजार रुपये साहित्य शाळेला भेट देण्यात आले. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक संजय पाटील, रामराव जोजार, सुरेश कोळंबे, भास्कर वसुधा, निकम बलभिम, केंद्रे मनोज कलवले आदी शिक्षकांनी परिश्रम घेतले.

खंजर बाळगणाऱ्या एकास आंबानगर सांगवी परिसरातून अटक; रस्ता सुरक्षा पथकाची कारवाई

नांदेड (प्रतिनिधी)– शहराच्या विमानतळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत स्ट्रीट सेफ्टी ड्राईव्ह अंतर्गत रस्ता सुरक्षा पथकाने सांगवी बुद्रुक परिसरातील अंबानगर भागातून एकास अटक केली. त्याच्याकडून खंजर जप्त करून विमानतळ ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई ३१ मार्च रोजी करण्यात आली.

पथकप्रमुख संकेत दिघे व त्यांच्या सहकाऱ्यांनी विमानतळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत ३१ मार्च रोजी रोजी गस्त घातली. यावेळी अंबानगर सांगवी बुद्रुक परिसरात राहणारा धम्म दीप दत्ता नरवाडे (वय २७) याला ताब्यात घेऊन त्याची अंगझडती घेण्यात आली. या अंग झडतीत त्याच्याकडून एक खंजर जप्त करण्यात आला. पोलीस हवालदार दौलत ताटे यांच्या फिर्यादीवरून विमानतळ पोलिस ठाण्यात भारतीय हत्यार कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस हवालदार जाधव करत आहेत.

'एटीएम' मशीन चोरणारी आंतरराज्य टोळी 'एलसीबी'च्या जाळ्यात

दोन लाखांचा मुद्देमाल जप्त

नांदेड (प्रतिनिधी)– किनवट शहरातील गोकुंदा परिसरात असलेले एक एटीएम केंद्र फोडणाऱ्या फरार टोळीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली आहे. त्यांच्याकडून रोख एक लाख २२ हजार रुपये, दुचाकी, ग्राइंडर मशीन, वायर असा एक लाख ९४ हजार पाचशे रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी नांदेड शहरात TM² चोरीचे गुन्ह्यातील आरोपीतांचा शोध घेवून त्यांच्या विरुध्द कारवाई करण्याबाबत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांना आदेश दिले होते.

३० मार्च रोजी पोलीस उपनिरीक्षक साईनाथ पुयड, नागनाथ तुकडे व त्यांचे पथक गोपनीय माहिती आधारे गोकुंदा येथील एसबीआयचे एटीएम चोरीच्या गुन्ह्यातील आरोपी लक्ष्मणसिंग ठाकुरसिंग बावरी (वय २९, वर्षे व्यवसाय मजुरी रा. उमरी) व साथीदार

राजुसिंग मायासिंग बावरी (वय ३२ वर्षे), महेमुद मौला शेख (वय २८ वर्षे व्यवसाय मजुरी, सर्व रा. उमरी यास ताब्यात घेण्यात आले.

चौकशीत गोपणीय माहीतीच्या आधारे त्यांना ताब्यात घेवुन विचारपुस करुन त्यांच्याकडून एटीएम चोरीतील नगदी १ लाख २२ हजार रुपये, गुन्ह्यात वापरलेली दुचाकी व साहित्य जप्त केले.

श्री स्वामी समर्थांची पालखी मिरवणूक जल्लोषात

नांदेड (प्रतिनिधी) – 'भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे' असा संदेश देऊन भक्तांना विवंचनातून मुक्त करणारे अक्कलकोट निवासी श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या प्रकट दिनानिमित्त देगलूर शहरातील भक्तापूर रोड परिसरातील स्वामींच्या मंदिरात सोमवारी सकाळी स्वामींची पूजा अर्चा करून भूपाळी आरती करण्यात आली.

तदनंतर श्री स्वामी समर्थांच्या पालखी मिरवणुकीस प्रारंभ झाला, पालखी दत्तनगर, शिवनेरीनगर, नाथनगर आंबेडकरनगर, शिवबानगर मार्गाने निघाली. पालखी मिरवणुकीत वाजत गाजत स्वामीचा जयघोष करीत भक्तगण मोठ्या संख्येने सहभागी सहभागी झाले होते. मिरवणुकीत महिला भगिनींनी आनंदाने फुगडी खेळली. मिरवणुकीची सांगता झाल्यानंतर श्री स्वामी चरित्र पारायण जप माळ सेवा झाली.

सकाळी नैवेद्य आरती नंतर प्रकटदिना प्रसंगी केंद्राचे प्रमुख लक्ष्मण डांगे हे स्वामींचा महिमा भक्तांना दिलेला साक्षात्कार इत्यादी कथासार सांगितले. कार्यक्रमाची सांगता मंदियाळीच्या महाप्रसाद वाटपाने झाली. कार्यक्रमास शहरातील महिला, पुरुष भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्वारातीम विद्यापीठाच्या राज्यस्तरीय काव्यवाचन स्पर्धेत सोलापूरचा जैद शेख प्रथम

नांदेड (प्रतिनिधी)– स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सव व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मत्रिशताब्दीच्या निमित्ताने राज्यस्तरीय काव्यवाचन स्पर्धा घेण्यात आली. या काव्यवाचन स्पर्धेमध्ये सोलापूर येथील जैद अब्दुल हसन शेख हा विद्यार्थी प्रथम पारितोषिकाचा मानकरी ठरला.

या स्पर्धेत गोव्यासह राज्यातून ७३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेवून विविध विषयांवरील दर्जेदार कवितांचे सादरीकरण केले.

जैद अब्दुल हसन शेख यांचा ११ हजार रुपये, प्रमाणपत्र आणि स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. तर डॉ. बापूजी साळुंखे महाविद्यालय, धाराशिव येथील श्रुती जाधव ही उपविजेता ठरली. तिला ७००० रू. प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यशवंत महाविद्यालय नांदेड येथील कु. मोरे रुद्राणी बालाजीराव ही सर्व तृतीय ठरली. ५००० रू. व स्मृतिचिन्ह देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

अनुक्रमे १) भाग्यलक्ष्मी क्षीरसागर (फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे), २) सुरेश देवशेटट्टे (महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, मुखेड), ३) संस्कृती काळे (श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय, पुसद), ४) अजिंक्य शेळके (संभाजी कॉलेज ऑफ फार्मसी), ५) कार्तिक दराडे (पशुवैद्यकीय महाविद्यालय, उदगीर) या पाच स्पर्धकांना उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले. प्रत्येकी १००० रू. स्मृतिचिन्ह देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले.

बळीरामपूर येथील दारूबंदी दुकान स्थलांतराच्या मागणीसाठी रास्ता रोको

नवीन नांदेड (प्रतिनिधी) – नांदेड तालुक्यातील ग्राम पंचायत कार्यालय अंतर्गत असलेल्या मुख्य रस्त्यावरील देशी दारू दुकान स्थलांतरित करण्यात यावे, या प्रमुख मागणीसाठी बळीरामपूर येथील ग्रामस्थांच्यावतीने बळीरामपुर चौक येथे मंगळवारी रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात सरपंच सौ. रेणुका पांचाळ, ग्रामपंचायत सदस्यांसह महिला, युवक सहभागी झाले होते. या रास्ता रोको आंदोलनामुळे वाहतूक खोळंबली होती. १० एप्रिल पर्यंत दारू दुकान स्थलांतरित न झाल्यास आत्मदहन करण्याचा इशारा सरपंच सौ. रेणुका पांचाळ यांनी दिला आहे.

बळीरामपुर ग्रामपंचायत अंतर्गत असलेल्या मुख्य रस्त्यावरील देशी दारू दुकान स्थलांतरित करण्यासाठी गेल्या वर्षापासून निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली होती. ग्राम सभेत तसा ठरावही पारित करण्यात आला होता. हा ठराव जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक,अधिक्षक उत्पादन शुल्क नांदेड तसेच ग्रामीण पोलीस स्टेशनच्या निरीक्षकांनाही यांना देण्यात आला होता. या प्रकरणी १ एप्रिल रोजी रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा दिला होता.

पण प्रशासनाने मागणीची दखल न घेतल्यामुळे १ एप्रिल रोजी सकाळी अकरा वाजता औद्योगिक वसाहतीतील मुख्य मार्गावर सरपंच सौ. रेणुका इंद्रजित पांचाळ, उपसरपंच नागेश वाघमारे, सदस्य रविंद्र भंडारे, किशन गव्हाणे, आरती रवी डोईबळे, अनिता तेलंग, साहेबराव चित्रे, नरसिंग गडपवार, संदीप डुमणे, ज्ञानोबा दासरवार यांच्यासह माजी सरपंच नागोराव अंबटवार, सरपंच प्रतिनिधी इंद्रजित पांचाळ, गावातील नागरिक, युवक, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी ग्रामीण पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन गढवे उपनिरीक्षक ज्ञानेश्वर भोसले यांच्या सह पोलीस अंमलदार सुर्यवंशी, होमगार्ड यांनी कडेकोट पोलिस बंदोबस्त ठेवला होता.

रास्ता रोको आंदोलन झाल्या नंतर उत्पादन शुल्क कार्यालयाच्यावतीने सरपंच सौ. पांचाळ यांना पत्र देण्यात आले. संबंधित दुकानाचे स्थलांतर त्रुटी पूर्ण होताच देशी दारू दुकान स्थलांतरित करण्यात येईल, अशी ग्वाही उत्पादन शुल्क विभागाने दिली आहे.

Godateer Samachar हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com